# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००८ |
| वर्ष | : | नववे |
| अंक | : | १० |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १३३**

MAHMAR 19358/13/1/2000-TC



'विद्या प्रसारक मंडळ
ठाणे

व्ही. पी. एम्.
# दिशा

वर्ष नववे / अंक १० / सप्टेंबर २००८

## संपादकीय

## मानवी जनावर

मानव आणि इतर सजीव प्राणी यांच्या शरीररचना, पेशीरचना आणि कार्य यांच्यामध्ये गुणात्मकरीत्या काहीही बदल नाही हे, विज्ञानाने नुकतेच सिद्ध केले. सजीवांमध्ये मानव आणि वानर सदृश प्राण्यांच्या जैव नकाशामध्ये ९८ ते ९९% साधर्म्य आहे. फरक इतका नगण्य आहे की, त्यामुळे मनुष्य हा कुठल्याच कसोटीवर वेगळा 'प्राणी' होऊ शकत नाही. अनेक मानवी भावना म्हणजे राग, लोभ, मत्सर यांचे अस्तित्वही इतर सजीव प्राण्यांमध्ये दिसून येते. थोडक्यात म्हणजे 'जनावरे' आणि 'माणूस' यांमध्ये पेशीकार्यांच्या दृष्टीने काहीही फरक नाही. डार्विनच्या उत्क्रांतिवादामुळे वैज्ञानिकांना याची उकल करणे शक्य झाले.

पाश्चात्य जडवादाची मुळे ही प्रामुख्याने ख्रिस्तीधर्मामध्ये मानवाला दिलेल्या श्रेष्ठत्वाच्या स्थानामध्ये आहे. सर्व सजीव आणि निर्जीव सृष्टीचा उपभोग घेण्याचा अमर्याद अधिकार या संकल्पनेमुळे मानवाला मिळाला. म्हणूनच ख्रिस्ती धर्माचा डार्विनचा सिद्धांत आणि सजीवांच्या समानतेला विरोध आहे. हिंदूंच्या सृष्टिनिर्मितीच्या संकल्पना या संपूर्णत: भिन्न आहेत. सजीव आणि निर्जीवांमध्ये तो समान दैवी अंश पहातो. आणि त्याच्या या भूमिकेमुळे निसर्गाच्या उपभोगाच्या बाबतीतही त्याच्या संकल्पना या पाश्चात्यांपेक्षा संपूर्णपणे भिन्न आहेत. पर्यावरणाच्या आजच्या ऱ्हासाला पाश्चात्यांची उपभोग आणि जडवादी वृत्ती कारणीभूत असल्याचे आज सर्वमान्य आहे. आणि यामध्ये बदल घडवायचा असेल तर, आपल्या 'जीवनशैली' मध्ये बदल करायला हवा; हेही आता सर्वमान्य झाले आहे.

'जीवनशैली' चा हा मुद्दा पर्यावरणापुरताच मर्यादित नसून मानवी-अधिकार, स्त्री - पुरुष समानता, तंत्रज्ञानाचा विकास ते धर्म आणि विज्ञान, या सगळ्यांना तो छेदून जातो. जीवनशैली म्हणजे दुसरं काहीही नसून आपण आपल्या वागण्याच्या पद्धती ज्या सिद्धान्तावर विकसित करतो, त्याचा तो बाह्याविष्कार असतो. 'मानव हा श्रेष्ठ', हा सिद्धान्त मान्य केला की इतर सर्व प्राणिमात्र व निर्जिव वस्तूंना दुय्यम स्थान तर मिळतेच आणि यांच्या अनियंत्रित उपभोगाला मान्यताही मिळते. यांतून जे असंतुलन निर्माण होते ते सर्वच सृष्टीला विनाशाकडे नेते. म्हणजे अनियंत्रित, स्वैराचारी, आत्मकेंद्रित विचार आणि त्यावर आधारलेली जीवनशैली 'संतुलित' समाज निर्माण करू शकत नाही.

(पृष्ठ क्रमांक ३० वर)



# स्वप्न साकारत आहे...

हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे खुशालचंदांचे, नव्हे ते आरामितांचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावलेल्यांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, नसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासी मग्न त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,
न एके यामिनीं
दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही ते करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता ज्याची महान, सीमा ज्याची अस्मान !
हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,
मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां
स्वप्न दिसे साकारले
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा -
ओसाड भूमी कर्दमी जिथे घाण
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,
दिनरात्र प्रकाश असा, अस्त न ज्या कल्पिला.
भव्य वास्तू इथे साकारतां, दृश्य ज्याचे महान,
शिल्पही ज्यांचे विशेषज्ञान देखिती
मनीं ते सुजाण,

दृश्य देखतां आणावे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगतां,
उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगविता मग्न जे मानसी
स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती
विज्ञानसत्रीं सदा ज्यांची वाहिली मती,
कलावंत, सारस्वतीचे तन्मयी, तसे वैज्ञानिक महान्,
इथे जन्मती प्रतिभा ज्यांची देदीप्यमान
भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती
शक्तियुक्ति ज्यांची भारतमातेप्रती
नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर ज्यांचे अणुरेणी वसे.
बालके तव शिशुमंदिरीं दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि ज्याची, शक्ति ज्याची भारतभूचा ठेवा

ना.भा.वैद्यकर



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष नववे / अंक १० / सप्टेंबर २००८

संपादक
डॉ. विजय बेडेकर

कार्यकारी संपादक
प्रा.. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १३ वे / अंक ३ रा)

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ ११९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री ज्ञानदेव वाङ्मय चर्चासत्र | डॉ. प्रदीप कर्णिक | ३ |
| २) | तुकारामांच्या अभंगातील नाममहिमा | श्रीमती आशा भिडे | ६ |
| ३) | संत सेना महाराज : चरित्र | श्री. शं. बा. मठ | ११ |
| ४) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १५ |
| ५) | वाचावीत अशी पुस्तके | श्री. शरद जोशी | १९ |
| ६) | व्यक्तिमत्त्व विकास - काळाची गरज | सौ. उषा कळमकर | २२ |
| ७) | पाप - पुण्य | सौ. मोनिका दिलीप कुंवर | २५ |
| ८) | चीन मधील विज्ञान प्रदर्शनात ठाण्याच्या विद्यार्थ्यांचे यश | डॉ. सुधाकर आगरकर | २६ |
| ९) | भाव | श्री. यशवंत माने | २८ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान विधी व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत, म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा, स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी, त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ
विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठवताना आपला
पूर्ण पत्ता, पिन कोड व
दूरध्वनी कळवावा.

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.४०० ६०२**
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) ''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा'' या नावाने पाठवावा.**

# परंपरा आणि शैक्षणिक नवप्रणालीचा सुरेख संगम
# श्री ज्ञानदेव वाङ्मय चर्चासत्र

*पुणे विद्यापीठाचे श्री ज्ञानदेव अध्यासन व श्रीपाद सेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या चर्चासत्राचा हा विशेष वृत्तान्त - संपादक*

पुणे विद्यापीठाच्या 'श्रीज्ञानदेव अध्यासना' वर कीर्तन परंपरेचा सखोल अभ्यास असणाऱ्या डॉ. यशवंत पाठक यांची निवड झाल्यावर, त्या अध्यासनाला पुन्हा चैतन्य प्राप्त होईल अशी अनेकांची अटकळ होती व ती सार्थ ठरवणारी घटना, अलीकडेच पुण्यात घडून आली. दिनांक २८ मे २००८ बुधवार ते ३० मे २००८ शुक्रवारपर्यंत तीन दिवसांचे एक भरगच्च असे चर्चासत्र विद्यापीठाच्या 'श्रीज्ञानदेव अध्यासना'ने पुण्यात भरवले होते. अध्यासनाने चांगलीच कात टाकली आहे, असे म्हणायला हरकत नाही.



'संत ज्ञानदेव वाङ्मय अभ्यास चर्चासत्र' असे या परिसंवादाचे स्वरूप होते व श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या वाङ्मयाचा सर्वांगीण अभ्यास व्हावा म्हणून हे विशेष चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. श्रीज्ञानेश्वरांच्या वाङ्मयावर वेळोवेळी आणि ठिकठिकाणी चर्चासत्रे, परिसंवाद होत आले आहेत, त्यात विशेष असे काय, असे कोणालाही वाटेल; परंतु खरोखर या एका परिसंवादाने अनेक बाबी घडून आल्या आहेत.

पहिलीच गोष्ट अशी की, विद्यापीठाने प्रस्तुत चर्चासत्र आपल्या परिघाच्या आणि परिवाराच्याही बाहेर आणले. विद्यापीठाचा परिघ म्हणजे केवळ त्यांची 'खिड'. या खिडीतून बाहेर येणे व जनसामान्य माणसांपर्यंत येऊन पोहोचणे, भल्याभल्यांना जमत नाही. चार-दोन अभ्यासकांसमोर हल्ली असले परिसंवाद होतात वा शिक्षक-प्राध्यापक-डॉक्टर-संशोधकांच्या वर्तुळा बाहेर अभ्यासाचा आणि अभ्यासकांचा आवाज पोहचत नाही, हे खरे तर दुर्दैवच! 'श्रीज्ञानदेव अध्यासना'ने पुण्याच्या एका संस्थेच्या सहकार्याने हे चर्चासत्र आयोजित केले. कै. श्री. श्री. द. (तथा मामासाहेब) देशपांडे यांच्या 'श्रीपाद सेवा मंडळा' च्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम संपन्न झाला. स्वत: श्री मामासाहेब देशपांडे थोर संत तर होतेच, पण श्रीज्ञानदेवीचे व श्रीज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाचे अभ्यासक, मर्मज्ञ रसिक, चाहते व अनुभव संपन्न भाष्यकार होते. हा अपूर्व योग डॉ. यशवंत पाठक यांनी साधला हीच अत्यंत महत्त्वाची बाब म्हणायला हवी.

दुसरे असे की, दुर्दैवाने मराठी संत वाङ्मयावरची विद्यापीठीय चर्चा कमालीची रूक्ष आणि शब्दबंबाळ होत आलेली आहे, असा अनेकांचा अनुभव आहे. संत साहित्याचा गाभा, त्याचा रसाळपणा, सर्वच संतांची असणारी अनुभूतीपूर्ण शब्दकळा, चैतन्याची रसरसती भाषाशैली, ब्रह्मानंदाचा ताल-लय-सूर, परतत्त्वाचा स्पर्श झालेले कवित्व, दिव्यत्त्वाचा अनुभव देण्याची हातोटी, अशा असंख्य गुणांचा साधा ओझरता स्पर्शही विद्यापीठीय चर्चांमधून जाणवत नाही. प्रस्तुत चर्चासत्राच्या माध्यमातून, डॉ. यशवंत पाठक, ज्यांच्याकडे शैक्षणिक व पारंपरिक अशा दोन्ही परंपरा आहेत, यांनी या दोन्ही परंपरा या चर्चासत्राद्वारे एकत्र आणण्याचा अनोखा प्रयत्न केला. विद्यापीठांनी अनेक विषयांमध्ये आपली कक्षा

रुंदावली पाहिजे यात शंका नाही. विशेषत: भारतीय तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, धर्म, कला, साहित्य, आयुर्वेद इत्यादी विषयांत परंपरा आणि नवप्रणाली यांचा सुरेख संगम होऊ शकतो. मराठी संत वाङ्मय याचमध्ये येते वा आणले पाहिजे.

तीन दिवसांच्या या चर्चासत्रात तीन-चार तासांची रोज दोन अशी पाच सत्रे झाली. बुधवारी रात्री दोन तासांचा पारंपरिक पद्धतीने श्रीज्ञानदेव महाराजांचा हरिपाठ साजरा झाला, तर शेवटच्या दिवशी किशोरी अमोणकर यांच्या शिष्या जुई धायगुडे यांचे श्रीज्ञानदेवांच्या अभंगांचे, ज्याला स्वत: किशोरीबाईंनी चाली लावलेल्या आहेत, शास्त्रीय गायन झाले.

जी पाच चर्चासत्रे झाली, त्यांमध्ये वक्ते व विषय यातच मूलत: वैविध्य दिसून येत होते. पारंपरिक पद्धतीतून प्रवचने करणारे भाष्यकार आणि विद्यापीठीय पठडीतून 'शास्त्र' शुद्ध शिक्षण घेतलेली प्राध्यापक मंडळी, अशा दोघांचा सुरेख संगम इथे झाला होता.

ज्यांना संपूर्ण श्रीज्ञानेश्वरी मुखोद्गत आहे, अत्यंत रसाळ प्रवचनकार म्हणून जे प्रसिद्ध आहेत, आषाढी वारीमध्ये श्रीसंत ज्ञानेश्वर माउलींच्या पालखी बरोबर सतत पायी वारी करतात, ज्यांचे संस्कृत व मराठीवर उत्तम प्रभुत्व आहे, अशा पाथर्डीच्या ह.भ.प. श्री. मुकुंदकाका जाटदेवळेकर यांचे 'श्री माउलींच्या अभंगवाणीचे स्वरूप' या विषयावर पहिल्याच सत्रात व्याख्यान ठेवण्यात आले होते. रसाळता म्हणजे काय, याचा उत्तम दाखला म्हणजे हे व्याख्यान!

त्याच दिवशीच्या दुपारच्या सत्रात प्रा.डॉ. यशवंत साधू यांचे विद्यापीठीय पठडीचे 'अमृतानुभवातील आत्मानुभूतीचे सौंदर्य' या विषयावर व्याख्यान झाले. 'महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय', उदगीर येथे डॉ. साधू अनेक वर्षे मराठीचे प्राध्यापक होते. 'काव्यसौंदर्य' या सर्वच प्राध्यपाकांना आवडणाऱ्या मुद्द्याला न सोडताही, त्यांनी अमृतानुभवातील सौंदर्य खुलवून खुलवून विशद केले. याच बरोबर त्यांनी परंपरा, आत्मानुभूतीलाही सहज स्पर्श केला आणि याचे कारण त्यांच्याकडे चालत आलेली त्यांच्या घराण्याची परंपरा. वै. शंकरमहाराज खंदारकर यांचे ते सुपुत्र तर आहेतच पण संत विठोबारायांच्या वाङ्मयाचा आणि खंदारकर महाराजांच्या वाङ्मयाचा त्यांचा उत्तम अभ्यास आहे.

दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात संपूर्णपणे विद्यापीठाय तत्त्वाचे, शैलीचे आणि व्यासंगपूर्ण सखोल ज्ञान योगियाचे व्याख्यान झाले. तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक डॉ. शं.रा. तळघट्टी यांचे 'चांगदेव पासष्टीतील तत्त्वज्ञान' या विषयावर अत्यंत सुंदर व्याख्यान झाले. ज्ञानेश्वर महाराजांनी केवळ ६५ ओव्यांमध्ये मांडलेल्या तत्त्वज्ञानापुरते न पहाता, डॉ. तळघट्टींनी व्यापक 'सत-चित-आनंदा'ची संकल्पना सुरेख विशद केली आणि ज्ञानदेवांच्या लेखी 'मी-तू पण' कसे लोप पावले होते, ते त्यांनी उत्कट शब्दांतून मांडले. डॉ. तळघट्टी सरांना सारेच ओळखतात. ३६ वर्षे त्यांनी अध्यापन केले आहे आणि ढवळे सुवर्ण पदक, राधाकृष्णन पारितोषिक, मामासाहेब दांडेकर शिष्यवृत्ती, दक्षिणा फेलोशिप अशा विविध पुरस्कारांनी ते सर्वांना ज्ञात आहेतच. डॉ. तळघट्टीसरांच्या व्याख्यानावर अनेकानेक पद्धतीचे प्रश्न श्रोतृवर्गातून विचारले गेले व त्या प्रश्नांना त्यांनी दिलेली सविस्तर उत्तरे सुरेख व चपखल होती.

याच दिवसाच्या दुपारच्या सत्रात डॉ. नरेंद्र कुंटे यांनी 'हरिपाठातील नामशास्त्र' या विषयावर आपले अभ्यासपूर्ण विचार मांडले. डॉ. कुंटे हे सुद्धा डॉ. यशवंत साधू यांच्यासारखे दोन्ही परंपरा एकत्रितपणे अभ्यासणारे आहेत. ते स्वत: गुरुदेव रानडे यांच्या परंपरेचे अनुग्रहित आहेत. मराठी विषयाचे प्राध्यापक होण्यापूर्वी ते सात-आठ वर्षे दैनिक संचारमध्ये सहसंपादक होते. गुरुदेव रानडे परंपरा व

---

*परिस्थितीचे पिंजरे तोडल्याशिवाय माणसाची मुक्तता होत नाही.*

त्यांची नामसाधना या विषयावर त्यांनी अनेक पुस्तके लिहिली असून, त्यांनी आपल्या व्याख्यानात 'नाम' हेच असे एकमेव 'साधन' आहे याची हरिपाठातील ज्ञानेश्वरीतील ओव्यांचे दाखले देऊन चर्चा केली. 'आजच्या काळाची गरज व त्यात नामाचे महत्त्व विशद करताना त्यांनी गुरुदेवांचेही अनेक दाखले दिले. ओघवत्या शैलीत त्यांचे व्याख्यान रसपूर्ण झाले.

तिसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात ह.भ.प. श्री. सिद्धेश्वर बलराम महाराज यांचे 'ज्ञानेश्वरीतील गुरुवंदना' या विषयावर व्याख्यान झाले. श्री. सिद्धेश्वर बलराम महाराज ह.भ.प. जरी असले ती त्यांची शैक्षणिक बाजू अत्यंत सकस आहे. ते स्वत: संस्कृत विषय घेऊन एम.ए. झालेत. ते राष्ट्र भाषा पंडित असून साहित्य विशारदही आहेत. श्रीलंकेतून त्यांनी पी.एच.डी. सुद्धा मिळवली असून अध्यापक म्हणून ते सध्या निवृत्त झाले आहेत. प्राचीन संस्कृत पोथ्यांच्या संपादनात त्यांनी मोलाचे सहकार्य केले आहे. 'भागवत कथाकार' म्हणून ते मराठवाड्यात प्रख्यात आहेत. महाभारत, रामायण यांचे दाखले देत, कथा सांगत, त्यांची गुरुवंदना हा विषय अत्यंत सोपा व साधा करून मांडला.

प्रत्येक व्याख्यानासाठी दिलेला वेळ आणि व्याख्यात्याची निवड अचूक होती. डॉ. तळघट्टी सरांनी तर हे समाधान आपल्या व्याख्यानात बोलून दाखवले. ते असं म्हणाले की, "विद्यापीठात जी प्रामुख्याने चर्चासत्रे होतात, त्यात इतके विषय आणि वक्ते कोंबलेले असतात काही, दहा मिनिटातच तुम्हाला तुमचा विषय मांडावा लागतो. इथे असे नाही, इथे वक्त्याला भरपूर वेळ दिला असल्याने, सविस्तर मांडणी करायला वाव आहे. चर्चेसाठीही वेगळा वेळ असल्याने, तोही भरपूर असल्याने प्रश्नोत्तरे उत्तम होतील / झाली असतील."

व्याख्यानांच्या नंतर झालेल्या चर्चेत श्रीमामासाहेब देशपांडे यांचे उत्तराधिकारी, श्रीपाद सेवा मंडळाचे अध्यक्ष, श्रीज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाचे अत्यंत जाणकार अनुभूतीकार आणि विविध ग्रंथांचे लेखक प्राचार्य शिरीष (दादा) शांतराम कवडे यांनी मांडलेले विचार ऐकून श्रोते आणि डॉ. यशवंत पाठक थक्क झाले. नंतर डॉ. पाठक आग्रह कर करून प्राचार्य शिरीष (दादांना) कवडे यांना बोलण्याचा आग्रह करत असत. पाच-दहा मिनिटात दादा अत्यंत वेगळाच विचार श्रोत्यांच्या पुढे ठेवत की जो अत्यंत नवा व श्रोत्यांनी कधीच न ऐकलेला असे. याची ग्वाही श्रोतृवर्गात असणाऱ्या संत साहित्याचे गाढे अभ्यासक प्रा. रा. शं. नगरकर व डॉ. कल्याण काळे यांनीही दिली. श्रोतृवर्गात ९४ वर्षाचे ज्ञानेश्वरीचे अभ्यासक श्री. प्रभाकरपंत वैद्य यांच्या पासून पीएच.डी. करणारे, कोशकार, इतिहासकार यांचा भरणा पाहून आश्चर्य वाटत होते. २५०-३०० चा श्रोतृवर्ग मिळणे हे काही कमी नाही.

समारोपात डॉ. पाठक यांनी श्रीपाद सेवा मंडळाच्या सहकार्याचे, त्यांच्या अथक परिश्रम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे आणि तीन दिवस उत्तम सूत्रसंचलन करणाऱ्या डॉ. अरुण प्रभुणे यांचे आभार तर मानलेच, पण मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ व श्रीपाद सेवा मंडळ यांनी एकत्र येऊन आता सात दिवसांचे चर्चासत्र आयोजित केले पाहिजे असे आवाहन केले, त्यात पारंपरिक खेळ, कीर्तन, प्रवचन, वाद्य-संगीत व व्याख्याने यांचा समावेश असावा अशी अपेक्षा व्यक्त केली. ती फलद्रूप होवो.

डॉ. प्रदीप कर्णिक

फ्लॉवर व्हॅली, नारळीपाडा,

ठाणे ४०० ६०१.

दूरध्वनी - ५४७६१४५.

●●●

# तुकारामांच्या अभंगातील नाममहिमा

*श्री संत तुकाराम महाराज यांचे संत साहित्यातील योगदान हा विषय गहन आहे. असामान्य प्रतिभा असणाऱ्या या संताबद्दल सगळ्यांनाच जवळीक वाटते. त्यांच्या चौथ्या जन्मशताब्दी निमित्ताने हा लेख- संपादक*

नाम हेच सर्वसुखाचे सार होय आणि त्यानेच ईश्वरप्राप्ती व शांती प्राप्त होते असा नाम महिमा सर्वच संतांनी वर्णन केला आहे. अठरापगड जातीचे संत होते. चोखोबा व बंका महार, गोरोबा व राका कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, जोगा परमानंद तेली, नामदेव शिंपी, विसोबा खेचर, कान्होपात्रा, जनाबाई सारख्या स्त्रिया, तुकोबा वाणी आणि निवृत्ती, ज्ञानदेव, एकनाथांसारखे संत.



या सर्व संतांनी समानतेचा व भगवतभक्तीचा संदेश साऱ्या जगाला दिला.

देव भावाचा भुकेला।
जाती कुळ नाही त्याला॥

अशी त्यांची दृढ श्रद्धा होती.

''मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि
स्यु: पापयो नय:।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परांगतिम्॥''

माझ्या आश्रयाला आलेले नीच कुळात जन्मलेले लोकही परम श्रेष्ठ गतीला जातात. असा संदेश गीतेनेही दिलेला आहे.

तुकारामांची कविता भक्ती भावाने ओथंबलेली साधी साळ, रसाळ, सोपी अंत:करणाचा ठाव घेणारी. आत्मिक संघर्षातून त्यांची कविता निर्माण झाली. तिचे नाते थेट जीवनानुभवाशी निगडित असे आहे. म्हणून ती कविता जिवंत जातिवंत आहे. आज साडेतीन शतके उलटून गेली तरी त्यांचे काव्य समाजमनाला मोहवून टाकीत आहे. मानवी जीवनातील वास्तव, समस्या, संघर्ष, उद्रेक, भावनांचे कल्लोळ इ. सर्वांचे प्रतिबिंब त्यांच्या काव्यात उत्कट तरलतेने, प्रादेशिक भाषेचे लेणे लेवूनही प्रगट झालेले आहे. चिरंतन मानवी मूल्यांचा शोध घेत घेतच ते व्यक्तिगत अनुभवांना वैश्विक परिमाण, वैश्विक आशयघन देऊन जातात. म्हणूनच 'तुका आकाशा एवढा' होतो. मराठी माणसालाच नव्हे तर देश काल परिस्तितीच्या सर्व सीमा पार ओलांडून त्यांची कविता सर्वांना आपली वाटते. अखिल मानवतेविषयीचा जिव्हाळा त्यांच्या काव्यातून ओतप्रत ओसंडताना ठायी ठायी जाणवतो. अंत:सफूर्त उर्जेतून पाझरणारी सशक्त, रसस्रोत, मनाला भिडणारी शब्दकळा यामुळेच त्यांचे काव्य अजरामर झाले आहे. 'खेळ मांडियेला, वाळवंटी घाई। नाचती वैष्णव भाई रे॥' म्हणत आजही वारकऱ्यांचे पाय टाळ मृदंगाच्या ठेक्यावर नाचत गात पंढरीच्या वारीला जातात.

त्या काळी, साडेतीनशे वर्षापूर्वी यावनी अंमल सुरू झाल्याने बेदिल बनलेल्या बहुजन समाजाला त्यांची अभंगवाणी अमृतासारखी वाटली. या सर्व साधुसंतांनी

---

*विद्या तलवारीसारखी असते. तिला धारण करणाऱ्यावर तिचे महत्त्व अवलंबून असते. - डॉ. आंबेडकर*

भारतभर फिरून भागवत धर्माची पताका सर्वत्र फडकवली, समतेची ज्योत जागवली. भागवत धर्माचा प्रसार केला. लोकांना पंढरपूरच्या अध्यात्मपीठात एकत्र आणलं आणि भावी स्वराज्याला ज्या ऐक्याची जरूरी होती त्या ऐक्याचा पाया भरभक्कम केला.

देहूचे तुकाराम महाराज महाराष्ट्रातील बहुजन समाजाला आपलेसे वाटतात, कारण ते बहुजन समाजा-पैकीच होते. जातीने वाणी नि पिंडाने शेतकरी. 'याती शूद्र' असे ते स्वत:च्या जातीविषयी सांगत. वामन पंडितांनी म्हणूनच त्यांच्या बाबतीत म्हणून ठेवलेले आहे,

"ज्याची वदे पूर्ण वेदान्त वाणी,
कसे हो म्हणावे तयालागी वाणी?।
परब्रह्मरूपी असा हा तुकावा,
तयाचे तुकी कोण दुजा तुकावा?॥"

हिंदुस्थानात दोन वाणी विशेष प्रसिद्धीला आले एक तुकोबा नि दुसरे महात्मा गांधी. मनुष्याचा मोठेपणा त्याच्या जातीवर नाही हे दोघांनी सिद्ध केले. प्रपंचात रमलेल्यांना परमार्थाची गोडी तुकोबांनी लावली. आणि प्रपंच म्हणजेच सर्वस्व मानणाऱ्यांना देशहिताची दिशा महात्माजींनी दावली. 'जो नर करनी करे तो नर का नारायण होय.' ही म्हण दोघांनी खरी केली.

'असाध्य ते साध्य, करिता सयास।
कारण अभ्यास तुका म्हणे॥

सामान्य वाण्याचे ते परमभगवद्भक्त व संत शिरोमणी झाले; म्हणून ते लोकांच्या गळ्यातले ताईत बनले, लोकांच्या आदरास पात्र झाले. ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदासादी संताना त्यांच्या उच्च कुळातील जन्मामुळे ज्ञानाच्या ठेव्यापैकी बराचा भाग जो सहजी प्राप्त झाला होता. तसा तुकोयांना झाला नव्हता. स्वप्रयत्नाने झगडून त्यांना ज्ञान मिळवावे लागले.

संसारी लोकांना तुकोबा जवळचे वाटतात याचे कारण तेही त्यांच्याप्रमाणे संसारी होते.

'बहु पिडीलो संवसारे',
'संवसारे झालो अति दु:खे दु:खी',
'त्रासला हा जीव संसारीच्या सुखा',
'संवसार तापे तापलो मी देवा।
करिता या सेवा कुटुंबाची'॥

असे स्वानुभवाने त्यांनी म्हटले आहे. या तापाला कंटाळून त्यांनी पांडुरंगाशी सख्य केले. सामान्य संसारी माणूसही अशा प्रकारचे उद्गार मनातल्या मनात हजार वेळा काढीत असतो; पण तरीही त्याला संसाराचा मोह असा सहजासहजी सुटत नाही. त्यातच तो गटांगळ्या खात राहतो. पण तुकाराम महाराजांनी तापदायक संसाराकडे उदासीनपणाने पाहण्याचा निश्चय करून देवाशी सख्यत्वाचे नाते जोडले नि ते शाश्वत सुखाचे उपासक बनले. शेवटी त्यांना ईश्वरी साक्षात्कार झाला. ते सदेह वैकुंठाला गेले. ह्या मार्गाने आपणही गेलो तर आपल्यालाही भगवद् प्राप्ती होईल असा विश्वास संसारी लोकांना वाटतो आणि त्याचमुळे तुकोबांविषयी त्यांना आपुलकी वाटते.

बहुजन समाजाला व गृहस्थाश्रमी लोकांना पेलेल असा ईश्वर प्राप्तीचा मार्ग तुकाराम महाराजांनी दाखवला हेही त्यांच्या लोकप्रियतेचे कारण आहे. परमेश्वर हा भक्तीसाध्य आहे त्यासाठी वेदाध्ययन, पुराण श्रवण वगैरेची आवश्यकता नाही फक्त भक्ती हवी. 'नामसंकीर्तन' हा जीव व शिव याच्यात ऐक्य साधणारा दुवा आहे, जीवाला शिवाशी जोडणारा पूल आहे. असे त्यांनी आपल्याला अभंगातून कळकळीने सांगितले आहे.

'भावचि कारण भावचि कारण, मोक्षाचे साधन, बोलियेले।'
'कलियुगामाजी करावे कीर्तन, तेणे नारायण देईल भेटी।'
'नाम घेता उठा उठी, होय संसाराची तुटी।'
'नामसंकीर्तन साधन पै सोपे, जळतील पापे जन्मांतरीची।'

'न लगे सायास जावे वनांतरा, सुखे येतो घरा, नारायण।'
'हृदयीच बैसोनी करा एकचित्त, आवडी अनंत आळवावा।'
'रामकृष्ण हरि विठ्ठल केशवा, मंत्र हा जपावा सर्वकाळ।'
'याहुनि आणिक नाही पै साधन, वाहतसे आण विठोबाची।'

असे किती अभंग सांगावे? त्यांच्या मुखातून मोत्याच्या लडी सारख्या शब्दांच्या लडी उलगडत जायच्या. त्यांचं सगळं बोलणंच काव्यातून प्रगट व्हायचं. रात्रीच्या निवांत वेळी ते आपले दिवसभरात सुचलेले अभंग वहीत उतरवून ठेवायचे.

ज्ञानेश्वर, नामदेवांपासून चालत आलेल्या भागवत धर्माचा, भक्तिमार्गाचा प्रसार तुकारामांनी खूपच केला. संसारात राहूनही पूर्णपणे वैराग्य अंगी आणता येते ही शिकवण त्यांनी स्वत:च्या उदाहरणाने दिली. संसार न सोडता तो सुखाचा कसा करता येईल याविषयी

जोडोनिया धन उत्तम वेव्हारे।
उदास विचारे वेच करी॥

असा सोपा गुरुमंत्रच दिला. बहुजन समाजाला बहुजन समाजाच्याच भाषेत स्वत:च्या दु:खातून बाहेर कसे पडावे हे सांगणारा संतकवी तुकारामाच्या रूपाने मिळाला. 'शुद्ध बीजा पोटी फळे रसाळ गोमटी', 'आधी बीज एकले, बीज अंकुरले रोप वाढले' त्यांच्या अशा अभंगात स्वत:च्या निर्मल जीवनाचे जसे प्रतिबिंब पडले आहे तसेच सभोवतालच्या समाज जीवनाचेही पडले आहे. त्यांचे अभंग ही त्यांची वाङ्मय मूर्तीच आहे, त्यांचे जीवनचरित्रच आहे. जुन्या संतकवीत त्यांच्या इतकी आत्मलक्षी कविता क्वचितच कोणाची असेल.

शुद्ध चारित्र्य हे लोकप्रियतेचे आणखी एक कारण. त्यांच्या विरोधकांनी त्यांना भुलवायला पाठवलेल्या गणिकेला ते भक्तिमार्गाला लावतात. 'पराविया नारी रखुमायी समान.' कनक आणि कान्ता यांचा मोह त्यांना कधीच पडला नाही. शिवाजी महाराजांनी पाठवलेला नजराणा त्यांनी परत पाठवला होता.

देहूतील सालोमालो व मंबाजी सारख्या ग्रामकंटकांनी त्यांना अनेक प्रकारे छळले. वेदमंत्र पठणाबद्दल त्यांना गाढवावर बसवून गावाबाहेर हाकलून लावण्याची, त्यांच्या अभंगाच्या वह्या इंद्रायणीत बुडविण्याची शिक्षा त्यांना रामेश्वर भट्ट वाघोलीकरांसारख्या शब्दज्ञानी सनातन्याने दिली. तुकारामांनी सर्व कुटुंबियांसमवेत इंद्रायणीकाठी एकवीस दिवस उपोषण करून देवाला साकडे घातले. विठ्ठलानं ते ऐकलं नि इंद्रायणीनं वर येऊन त्या सर्व वह्या न भिजवता कोरड्याच्या कोरड्या तुकोबांना परत आणून दिल्या. हे पाहून मात्र त्यांचे विरोधक त्यांचे शिष्य बनले.

त्यांचे अभंग म्हणजे लोकांच्या चालत्या बोलत्या श्रुतीच आहेत. लहान मोठ्या चरणांचे हे अभंग जिव्हाळा, सहानुभूती यांनी तुडुंब भरलेले आहेत. ईश्वराविषयी प्रेम, मानवजातीविषयी करुणा, पशुपक्ष्यांविषयी, वृक्षवेलींविषयी सद्भाव, दुर्जनांविषयी सहानुभूती दंभिकांचा तिरस्कार आणि एक प्रकारची सूक्ष्म विनोद बुद्धी त्यांच्या अभंगातून ओतप्रत भरलेली आहे. त्यांचे मन मृदू तर भाषा रोखठोक, रांगडी पण उत्कट आणि आत्मस्पर्शी आहे.

'मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास।
कठीण वज्रास भेदू ऐसे'॥
'भले जित अस्ते निजोनिया जागे।
जो जो जे जे मागे ते ते देऊ'॥
'भले तरी देऊ कासेची लंगोटी।
नाठाळाचे काठी देऊ माथा॥'

त्यांचे भावपर अभंग भावगीतेच होत व वैचारिक अभंग स्तोत्रासारखे आहेत,

'संतकृपा झाली इमारत फळा आली।
ज्ञानदेवे रचिला पाया, रचियेले देवालया।

---

आपण स्वत:च स्वत:चे मित्र किंवा शत्रू असतो.

नामा तयाचा किंकर, तेणे केला हा विस्तार।
जनार्दन एकनाथ ध्वज उभारला भागवत।
भजन करा सावकाश, तुका झालासे कळस॥'

●● ●● ●●

नाम न घेणाऱ्याला ते काय म्हणतात पहा -

''नाम न वदे ज्याची वाचा।
तो लेक दो बापाचा॥१॥ ॥ध्रु॥
हेचि ओळख तयाची।
खूण जाणा अभक्ताची॥
ज्यासी विठ्ठल नाही ठावा।
त्याचा संग न करावा॥२॥
नाम न म्हणे ज्याचे तोंड।
तेचि चर्मकाचे कुंड॥३॥
तुका म्हणे त्याचे दिवशी।
रांड गेली महारापाशी॥४॥
हरि म्हणता गति, पातके नासती।
कळिकाळ कापती हरि म्हणता॥ध्रु॥
हरि म्हणता भक्ति, हरि म्हणता मुक्ति।
चुके यातायाती हरि म्हणता॥६॥''

''तपे अनुष्ठाने न लगती साधने।
तुटती बंधने हरि म्हणता॥
तुका म्हणे भावे जया हरिचे नाम।
मग काळ यम शरण तुझा॥''

●● ●● ●●

ही आणखी उदाहरणे पहा. नामाचा महिमा सांगणारे तुकारामांचे अगणित अभंग आहेत, त्याच्या गाथेत. किती नि कोणती उदाहरणे सांगावी!

नाम आहे जयापाशी।
जेथे राहे तेथेंचि काशी॥१॥ध्रु॥
ऐसा नामाचा महिमा। जाणे वाल्मीक शंकर उमा॥६॥
नाम प्रल्हाद बाळ।
जाणे पापी अजामेळ॥२॥
नाम जाणे तो नारद।
नामे ध्रुवा अक्षय पद॥३॥
नाम गणिकेते तारी।
पशु गजेंद्र उद्धारी॥४॥
नाम जाणे हनुमंत।
जाणताति महासंत॥५॥
नाम जाणे शुकमुर्ति।
जाणे राजा परिक्षिती॥६॥
नाम जाणे तुका।
नाही संसाराचा धोका॥७॥

●● ●● ●●

राम नामाचे पवाडे।
अखंड वाचा पढे॥१॥ध्रु॥
धन्य तो एक संसारी। राम नाम जो उच्चारी॥६॥
रामनाम गर्जे वाचा।
काळ आज्ञाधारक त्याचा॥२॥
तुका म्हणे रामनामी।
कृतकृत्य जालों आम्ही॥३॥
'जय जय म्हणा राम। हाते टाळी वाचे नाम॥'
'नाम पावन पावन त्याहून पवित्र आहे कोण॥'
'अरसावले मन जीवनाचे ओढी।
नामरूपीं गोडी लावियेली॥'

असे कितीतरी अभंग सांगता येतील.

●● ●● ●●

कस्तुरीचें रूप अति हीनवर।
माजी असे सार मोल तया॥१॥ध्रु॥
आणिक ही तैसी चंदनाची झाडे।
परिमळे वाढे तेणे॥२॥

फिरंगी आटिता नये वाराभके।
गुण मोले विकें सहस्त्रवरी॥३॥
तुका म्हणे नाहीं जातीसवे काम।
ज्याचे मुखीं नाम तो चि धन्य॥४॥

●● ●● ●●

नामाचा डांगोरा फिरवी घरोघरी।
म्हणा श्रीहरी सर्वभावे॥१॥
नामे इरती कर्मे वैकुंठींची पै व।
संनिध श्रीपती सदोदित॥२६॥
(मोठा आहे म्हणून पूर्ण दिला नाही)

●● ●● ●●

नाम घेतां तायां गेला।
ऐसा कोणे आईकिला॥१॥धृ॥
सांगा विनवितो तुम्हांसी।
संत महंत सिद्ध ऋषी॥६॥
नामे तरला नाही कोण।
ऐसा यावा निवडून॥२॥
सळगोच्या उत्तरा।
तुका म्हणे क्षमा करा॥३॥

●● ●● ●●

त्यांच्या रोमरोमांत हरिनाम भिनले होते. जळी स्थळी काष्ठी पाषाणी त्यांना पांडुरंगच दिसत होता. हरिनामाच्या गजरात एकदा का त्यांची ब्रह्मनंदी टाळी लागली की, तेच हरिमय होऊन जायचे आणि मग --- हरिच सोयरा व्हायचा,

श्रीमती आशा भिडे
बी / ३, विजय अपार्टमेंटस्,
'आराधना' टॉकीज जवळ, ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०.

●●●



## पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज यावें । पसायदान हें ॥ १ ॥

जे खळांची व्यकटी सांडो। तया सत्कर्मी रति
वाढो। भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ॥२ ॥

दूरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो।
जो जे वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ॥ ३ ॥

वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ॥ ४ ॥

चला कल्पतरूंचे आरव। चेतना चिंतामणीचे गांव।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥५ ॥

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ ६ ॥

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिही लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ॥७ ॥

आणि ग्रंथोपजीविये । विशेषी लोकीं इयें । दृष्टादृष्ट
विजयें । होआवें जी ॥ ८ ॥

येथ म्हणे विश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ॥ ९ ॥

●●●

# संत सेना महाराज चरित्र
## लेखांक दुसरा

*श्रीसंत सेना न्हावी यांच्या चरित्रावरील हा दुसरा लेखांक - संपादक*

**सेनाजी महाराष्ट्रात :**

महाराष्ट्रात गेल्यावर निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई या वंद्य संत चतुष्टयांची चरणधूळ मस्तकी धारण करण्याचे सेनाजीने ठरविले होते. पण या चारही विभूतींनी काही वर्षा पूर्वीच संजीवनी समाधी घेऊन जीवनयात्रा संपविली हे वृत्त वाटेतच सेनाजींना कळले. त्यांचे सुखस्वप्न समूळ उध्वस्त झाले. सेनाजींच्या जन्माअगोदरच (खिस्ताब्द १३०१) या चौघांनी आपली जीवनयात्रा समाप्त केली होती. याची कल्पना सेनाजींना नव्हती.

सेनाजी पंढरपुरात आले. त्यांचे ऊर भरून आले. आपल्या जीवनाचे सार्थक झालेसे वाटले. तेथील वातावरणात ते रमून गेले. कारण त्यांना येथील वातावरण विलोभनीय व आकर्षक वाटले. त्यांच्या नेत्राचे पारणे फिटले. तिथे परस्पर एकमेकांची पायधूळ मस्तकी लावत व कडकडून भेटत. आपुलकीने एकमेकांची विचारपूस करीत. त्यांना आदराने आपल्याकडे नेत. इथे जातपातीचा गंधही त्यांना आढळला नाही. केवळ सख्यत्वाचे विलोभनीय दृश्य सेनाजींना पाहावयास मिळाले.

चंद्रभागेत स्नान करून पुंडलीकाचे दर्शन घेऊन सेनाजी विठ्ठल मंदिरात गेले. एकटक पांडुरंगांकडे निरखून पाहू लागले. बांधवगडी आपल्या रक्षणासाठी पांडुरंगच आला होता, याची त्याना इथे पावतीच मिळाली. ते अभंगात म्हणतात,

विटेवरी उभा। जैसा लावण्याचा गाभा।
पायी ठेवूनिया माथा। अवघी निवारीली चिंता।
समाधान चित्ता। डोळा श्रीमुख पाहाता।
बहुजन्मी केला लाग। सेना देखे पांडुरंग।

पंढरपूर शहर त्याना अतिशय आवडले. त्यांनी तिथेच मुक्काम करावयाचे ठरविले. पंढरीबद्दल ते म्हणतात,

जाता पंढरीसी सुख वाटे जीवा। आनंदे केशवा भेटताची।
या सुखानी उपमा नाही त्रिभुवनी। पाहिली शोधुनी अवघी तीर्थे।
ऐसा नामघोष ऐसे पताकांचे भार। ऐसे वैष्णव दिगंबर दावा कोठे।
ऐसी चंद्रभागा ऐसा पुंडलिक। ऐसा वेणुनादी काळादावा।
ऐसा विटेवरी उभा कटेवरी कर। ऐसे पाहता निर्धार नाही कोठे।
सेना म्हणे खूण सांगितली संती। या परती विश्रांती न मिळे जिवा।

पंढरपूर क्षेत्राने सेनाजींवर जबरदस्त मोहिनी घातली त्यांना तिथे जखडून ठेविले. त्याचे एक महत्वाचे कारण, पांडुरंगासाठी त्यांनी घरदार प्रपंच याचा त्याग केला होता. प्रभु चरणाचा वियोग त्याना सहन होत नसे. तसेच ज्ञानदेव, नामदेव यांसारखे संतश्रेष्ठ पंढरीत कायम अगर वर्षातून काही काळ वास्तव्य करणारे होते. संतांचा सहवास हीच सेनाजींना देणगी वाटे.

उत्तरेकडील साधुसंतांची खूप बडदास्त ठेवावी लागत असे. त्यांचे भव्य थाटामाटात स्वागत सत्कार होत. तेथे नामदेव, सावतामाळी, गोरोबा कुंभार, चोखामेळा असे उच्च कोटीचे संतही 'राम कृष्ण हरी' गजर करीत अति सामान्य भक्ताच्या पायावर निगर्वीपणाने मस्तक टेकवीत, त्याला प्रेमाने आलिंगन देत, कीर्तन रंगी येहोप होत, नाचत, विठ्ठल चरणी सेवा रूजू करीत. हे सारेच दृश्य सेनाजींना आल्हादकारक वाटे. धार्मिक सामाजिक, समतेचा, ममतेचा हृदयंगम संगम विठू माउलीच्या भूवैकुंठी सेनाजींच्या

अनुभवास आला. सेनाजी याबद्दल अभंगात आपले मत व्यक्त करताना म्हणतात,

संत संगतीने थोर लाभ झाला। मोह विरस झाला मायादिक।
घातले बाहेरी कामक्रोध वैरी। बैसला अंतरी पांडुरंग।
दुजियाचा वाटा लागूनेही अंगा। ऐसे पांडुरंगा कळो आले।
संतांनी सरता केला सेना न्हावी। ब्रह्मादिका पाही नातुडे तो।

साधारणपणे महाराष्ट्रातील संत नामदेव, जनाबाई, गोरोबा कुंभार, परिसा भागवत, नरहरी सोनार, सावतामाळी, चोखामेळा, बंकामहार, उत्तरेकडील जगमित्र नागा, कबीर, कमाळ, रोहिदास इत्यादी संत सेनाजींच्या समकालीन असावेत. नामदेवांच्या परिवाराशी सेनाजींचा घनिष्ट संबंध होता. जनाबाई म्हणते,

सेना न्हावी भक्त भला।
तेणे देव भुळविला।

नामदेवांनी सेनाजींना भागवत धर्माची कुळकथा, निवृत्ती, ज्ञानदेव यांची जीवन चरित्रे, व कार्य अथपासून इतिपर्यंत कथन केले. अशी अद्‌भूत लोकोत्तर चरित्रे ऐकून सेनाजींच्या अंगावर रोमांच उभे राहिले. मी कमनशिबी. वडिलांच्या गुरू बंधुंच्या या चारही मुलांचे दर्शन घेण्याचे स्वप्न मी उराशी बाळगून होतो. पण माझ्या आशा पार मावळल्या. नामदवे म्हणाले हे चारही महात्मे अमर आहेत. ज्ञानदेव माझा सखा सोबती बाटाड्या होता. त्याच्या बरोबर उत्तरेत मी तीर्थयात्रा केली. समाधी प्रसंगी त्यांनी आवर्जून मला नेले. आजही मन अशांत झाले की आळंदीला जाऊन त्याला भेटून येतो. आळंदीला जा व प्रचीती घ्या. त्याच्या मस्तकावर हात ठेवून नामदेव म्हणाले माझा आशीर्वाद आहे. तुमची अभंग रचना भक्तिरस पूर्ण आहे. ती ज्ञानोबाच्या पायाशी ठेवा. तुमच्या रचना त्याला म्हणून दाखवा. तुमच्या प्रतिभेला नवा साक्षात्कार घडेल.

अत्यंत आनंदाने सेनाजी आळंदीला गेले. त्यांनी ज्ञानोबांच्या समाधीवर भक्तिभावाने मस्तक ठेविले. तिथे त्यांना समाधीच लागली. ते बराच काळ त्या अवस्थेत होते. ते हळू हळू भानावर आले. त्यांना पद्मासनाधिष्ठित सुंदर तेजःपुंज ज्ञानोबा दिसले. त्यांचा सारा शीण नाहीसा झाला.

तिथे सेनाजी बरेच दिवस राहिले. अनेक भक्त जनांच्या ओळखी झाल्या. त्यांच्या द्वारे ज्ञानोबांचे ग्रंथ, भावार्थ दीपिका, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी-त्यांचे काही अभंग यांच्या हस्त लिखितांच्या प्रती मिळवल्या. प्रत्येक ग्रंथाचे सूक्ष्म अवलोकन केले. त्यांची मती गुंग झाली. योगिशांचा राजा ज्ञानराज हाच माझा परात्पर गुरू होय अशी प्रचीती त्यांना आली. ते म्हणतात,

ज्ञानदेव गुरु ज्ञानदेव तारु। उतरील पैलपारू ज्ञानदेव।
ज्ञानदेव माता ज्ञानदेव पिता। तोडील भवव्यथा ज्ञानदेव।
ज्ञानदेव माझे सोयरे धायरे। जिवलग निधरि ज्ञानदेव।
सेना म्हणे माझा ज्ञानदेव निधान। दाविली निजखूण ज्ञानदेव।

ज्ञानदेवांनी सेनाजींच्या प्रतिभेला नवा उन्मेष देऊन बहुमुखी घडविली. सेनाजींनी महाराष्ट्रातील अनेक तीर्थक्षेत्रे पाहिली. रात्री मुक्कामपडे तेथे कीर्तनाचा कार्यक्रम होई. कीर्तनातून शुद्ध निखळ नामस्मरण व भक्तीचा पुरस्कार करीत. लांबूनचे लोक कीर्तन ऐकावयास येत असत. ज्ञानदेवांच्या परिवारातील पूज्य विभूतींची समाधिस्थळे, चांगदेव समाधी इत्यादि स्थानांना भेट दिली. आळंदीला अनेक दिवस राहून भरपूर अभंग रचना केली. अंदाजे आठ-दहा वर्षे सेनाजी महाराष्ट्रात हिंडले. वयाच्या पन्नासाव्या वर्षी ते पुन्हा आळंदीला आले. समाधीची सेवा करून लागले. एके दिवशी अचानक नामदेवांच्या त्वरित निघून येण्याचा निरोप आला. ते तत्काळ आळंदीहून निघाले पंढरपूरला पोहोचले.

सेनाजी पंढरपूरच्या वेशी जवळ पोहोचले. त्यावेळी तिथे शेकडो लोक टाळ मृदंग वाजवीत नाम घोष करीत

विठ्ठल मंदिराकडे जाताना दिसले. चौकशी केली असता त्यांना तेथील लोकांकडून कळले की नामदेव महाराज महाद्वाराच्या पायरी खाली जिवंत समाधी घेणार आहेत. हे ऐकताच त्यांच्यावर प्रचंड आघात झाला. ते धावत विठ्ठल मंदिराकडे आले. पायरी खोदून समाधीची सारी सिद्धता झाली होती. ते तीरासारखे आत घुसून नामदेवापाशी आले व त्यांचे चरण आपल्या अश्रूंनी धुतले. नामदेव हसले व म्हणाले, पंढरीरायाची परवानगी मिळाली, ज्ञानोबांचा दृष्टांत झाला की "नाम्या बस झाले", तुमची भेट झाली छान झाले. त्यांनी समाधी घेतल्यानंतर त्यांच्या परिवारातल्या बऱ्याच लोकांनी समाध्या घेतल्या. हे सारे सेनाजी विषण्ण मनाने पाहात होते.

त्यांच्या अंत:करणावर प्रचंड आघात झाला. त्यांना आयुष्य शून्यवत् वाटू लागले. नामदेवांशी त्यांचे अकृत्रिम व घनिष्ट संबंध जडले होते. नामदेवांच्या निर्वाणामुळे आपण एक सच्चा मित्र व मार्गदर्शक हरपल्याचे दु:ख त्यांना फार झाले.

**उत्तर भारत यात्रा :**

सेनाजींचे मन उद्विग्न व उदास होऊन गेले. पांडुरंग चरणी लोटांगण घालून ते पुन: भटकंती करण्याकरता पंढरपुरातून निघाले. त्यांनी उत्तर भारताची वाट धरली. रामानंद स्वामी यांनी उत्तर भारतात रामभक्तीची ध्वजा फडकविली. पंथभेद, उच्च नीचता यांना फाटा देणारे तसेच समता, विश्वबंधुता, सामाजिक सख्यभाव व एकेश्वरी उपासना या तत्त्वांचा हिरीरीने पुरस्कार केला. त्यांना लोकांचा प्रतिसादही उत्तम प्रकारे मिळाला होता. अनंतानंद, कबीर, सुखानंद, पद्मावती, नरहरीदास, पीपा, भवानंद, रोहिदास, धना, जाट, सुरसुरानंद हे त्यांचे विविध जातीतले व विभिन्न धर्मातले प्रमुख शिष्य होते. ते शिष्य समाजातल्या तळागाळापर्यंत ही तत्त्वे पोचवण्याचे कार्य करीत होते. श्री क्षेत्र काशीस आल्यावर सेनाजींनी या कार्यात स्वत:ला झोकून दिले. अनेकांशी त्यांचा संबंध जडला. महिपती भक्तिविजय ग्रंथात म्हणतात,

अनंतानंद, कबीर, सुखा, सुरसुरी, पद्मावती, नरहरी।
पीपा, भवानंद, रैदास, धना, सेन, सुरसुर की धरहरी।
औरों शिष्या प्रशिष्य एक एक उजागर।
विश्वमंगळ आधार सर्वानंद दशधा के आगर।
बहुत काळ व पुधारिके प्रणत जनन को पार दियो।

रामानंदांनी आपले गुरू रामानुजाचार्य यांच्याकडून भक्ती मार्गाचे धडे घेऊन उत्तरेकडील जन सामान्यात प्रचार व प्रसार करण्यासाठी रामभक्तीचा सांप्रदाय सुरू केला. शिष्यांचे त्यांना बहुमोल साहाय्य झाले, त्यात सेनाजींची गणना होते.

सेनाजींनी उत्तर प्रदेश, मध्यभारत, बिहार, राजस्थान, मारवाड, पंजाब, हिमाचल प्रदेश, या सर्वभागात फिरून रामभक्ती पंथाची लोकांना शिकवण दिली. आणि उच्च नीच भाव सोडून समान पातळीवर जगण्यास शिकविले. शिवाय त्या त्या प्रांतीय भाषेत पदेही रचली. त्यांचे एक पद,

'धूप दीप घृत साज आरती। वारणे जाऊ कमलापती।

हे शिखांच्या गुरु ग्रंथ साहेब या धर्म ग्रथांत समाविष्ट करण्यात आला आहे.

**अखेर :**

उतरलो पार। संसार सिंधु हा दुस्तर।
कृपा केली पांडुरंगे। सर्व निवाळी अंगे।
सुख संतोषा पडे मिठी। आवडी पोटी होती ते।
उपाधी वेगळा। सेना राहिला निराळा।

सर्व उपाधीतून मुक्त होऊन साक्षित्वाने जगात वावरणारा हा महान संत होता. उत्तरेत रामानंदाच्या कार्याला हातभार लावला. काशीत ज्या भागात सेनाजी राहात होते

त्या भागाला सेना पुरा मोहल्ला असे नाव पडले. तेथे त्यांच्या समाजबांधवानी सैन पंथ चालू केला. या पंथाच्या शेकडो शाखा उत्तर भारतात आहेत.

यानंतर ते सहकाऱ्यांचा निरोप घेऊन बांधवगडास निघाले. सेनाजींचे संपूर्ण आयुष्य एक महायात्राच होती. जन्मले मध्य भारतात, तिथे संतांचा मधुर सहवास घडला. महाराष्ट्राच्या पवित्र भूमीत वाढले. हिंडले उत्तर हिंदुस्थानात. अशा प्रकारे जीवन यात्रा चालू होती. ही यात्रा आटोपती घेतली. प्रपंचाची ओढ त्यांना नव्हतीच. फक्त जन्मभूमीची ओढ लागल्याने ते बांधवगडला परतले.

त्यांच्या आगमनाने बांधवगड येथील लोकांत नव चैतन्य प्राप्त झाले. त्यांच्या कार्याचा सुगंध तेथे पसरला होता. गावकऱ्यांनी त्यांचे भव्य स्वागत केले. राजा वीर सिंहाला गहिंवरून आले. सेनाजींनी आपला शब्द पाळला याबद्दल त्यांना धन्यता वाटली. सेनाजींची धर्मपत्नी सुंदराबाई व मुलगा यांना सेनाजी परत येतील याबद्दल शंका होती. ईश्वर कृपेने नातवंडाना आपल्या पुण्यवंत पितामहाचे दर्शन घडले.

श्रावण वद्य द्वादशी या दिवशी सेनाजी राजासकट गावातील लोकांना भेटून आले. खुंटीला टांगलेल्या धोकटीखाली पद्मासनात ध्यानस्थ बसले. विठ्ठलाचे नामस्मरण करता करता त्यांचे अनंतात विलयन झाले. एका थोर तपस्व्याची महायात्रा जगाला बरेच काही देऊन विराम पावली.

निळोबारायांच्या अभंगातून असे वर्णन आढळते.

जयजय जी विष्णु दास। भक्तिभाव तुझा कैसा।
प्रत्यक्ष पूर्णब्रह्म दानो। राजयासी आरसा।
जन्मोनि न्हावियाचे वंशी। भक्ती केली तुवाभोळी।
दाविले कौतुक। देव पूजेचिये वेळी।
श्रावण वद्य द्वादशी। सेना बैसे समाधीशी।
निष्ठा शरण प्रेमभावे। विष्णुदास सेनियासी।

मृत्यू साल उपलब्ध नाही. १३७० आत बाहेर त्यांनी जीवनयात्रा समाप्त केली असावी. राजा वीर सिंहाने बांधवगडला त्यांच्या स्मरणार्थ एक भव्य समाधी मंदिर बांधले. त्या ठिकाणी आज फक्त एक चबुतरा उरला आहे.

**सेनाजीची जीवन समालोचना :**

त्यांच्या जीवनात विशुद्ध चारित्र्य, प्रामाणिक ध्येयनिष्ठा, साधकावस्था, उत्कट भक्ती आदी ठळक वैशिष्ट्ये पाहावयास मिळतात. नावलौकिक, कीर्ती, प्रतिष्ठा, यासाठी त्यांनी कधीही स्पृहा बाळगली नाही. त्यांच्या निर्मळ व प्रामाणिक व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात पडले आहे.

सेनाजींची एकूण २६२ काव्ये, अभंगगाथा गीताधर्म मंडळ पुणे यानी प्रकाशित केलेल्या संपादित ग्रंथात समाविष्ट करण्यात आले आहेत. तौलनिक विचार करता नामदेव, जनाबाई, चोखामेळा यांच्या खालोखाल सेनाजींची काव्य निर्मिती आहे. तसेच गुणवत्तेतही श्रेष्ठ अशीच आहे. भाषा शैली प्रासादिक, रसाळ, प्रसन्न व भक्तीपर आणि स्वोजळ स्वरूपाची आहे. इतके असूनही सेनाजी स्वत:ला मंद बुद्धीचे मानीत. परंतु शब्द सृष्टीचे प्रति ईश्वर श्री तुकाराम महाराज आपल्या अभंगात सेनाजींच्या कवनाचे कौतुक करून, त्यांचा गौरव करतात. यावरूनच त्यांची थोरवी लक्षात येईल.

श्री. श्रं. बा. मठ

६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

●●●

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*ऑगस्ट मधील लेखाचा उत्तरार्ध येथे देत आहोत- संपादक*

**आप्तवाक्य :**

तेव्हां, पुन्हा एकदा ह्या लेखातील 'बीज संकल्पनेकडे वळून त्याबद्दल 'आप्तवाक्य ज्ञान' म्हणजे काय आहे ते पाहू या.

ह्या विश्वाच्या उत्पत्तिबाबत अनेक भौतिक व आध्यात्मिक सिद्धान्त आहेत.

ह्यांतील कोणता परिपूर्ण व विश्वासार्ह असावा याबद्दल विचार केला तर एक गोष्ट मान्य करायला लागेल कीं ज्या गोष्टी विश्वाच्या सद्यपरिस्थितीत दिसतात, जाणवतात त्या सर्वांचा समावेश त्या मूळ बीज संकल्पनेत असावयालाच हवा.

"जे पिंडीत नाही ते ब्रह्मांडात कुठून येणार? किंवा उलट जे ब्रह्मांडात (बाह्यतः) आहे ते पिंडीत असणारच!! ह्या तर्कपद्धतीने ह्या जगांत जी जैविक सृष्टि, अचेतन सृष्टि, भावात्मक, रागात्मक, कलात्मक, भावनात्मक, सौंदर्याची अभिव्यक्ति दिसणारी, तसेच भीषण, क्रौर्य संपन्न वगैरे गुणात्मक, सृष्टि आहे, त्या सर्वांचे मूळ बीज (अंड्यात) असावयालाच हवे आणि त्याचे विस्ताराचे, वृद्धिचे सूत्र देखिल तसेच सातत्याचे, सूत्र ह्या विश्वनिर्मितीच्या मूळ बीज अंड्यात असावयालाच हवे.

अत्यंत सूत्र पद्धतीने. शक्ति संप्रदायात ह्या विश्वाच्या निर्मितीत 'जी शक्ति' कारणीभूत असेल तिला 'तीन पदर' असावयालाच हवेत, असा विश्वास आहे.

कोणते हे तीन पदर?


१) इच्छा २) ज्ञान ३) क्रिया

म्हणजेच, Desire, Knowledge and Action, पाश्चात्य भौतिक विज्ञानात प्रामुख्याने ज्या Big Bang वगैरे सिद्धांताची वर्णने येतात त्यात ह्या 'इच्छाशक्तीच्या' संदर्भात काहीही चर्चा येतांना दिसत नाही. ते असे असेल तर 'मानव, प्राणी व वनस्पतींही' यांच्यात उघड दिसत असलेली व व्यक्त होणारी 'इच्छाशक्ती' कुठून पैदा झाली?

पण, भारतीय तत्त्वज्ञान, संस्कृती ज्या विचारांना मानते त्या सर्व शास्त्रात विश्वाच्या उत्पत्ती वर्णनात ह्या तीन शब्दांचा अंतर्भाव दिसतो.

इच्छाशक्ति के उत्पन्न होते ही चैतन्य में स्थित सूक्ष्म ब्रह्माण्ड के एक अंश अपने को (जो वास्तव में ब्रह्म का ही रूप है) अवभासित करने लगता है इस आभास को ही सृष्टि कहते हैं। यह आभास देश एवं काल में होता है। प्रलयकाल में यह आभास रूप सृष्टि फिर चैतन्य से समा जाती है, उसी प्रकार जिस प्रकार दर्पण से आभास उत्पन्न होता है और फिर उसी दर्पण में समा जाता है। जिस प्रकार दर्पण एवं आभास भिन्न-भिन्न प्रतीत होने पर भी एक है, उसी प्रकार सृष्टि शक्तिरूप ही है, और शक्ति तथा शक्तिमान की एकता हम बता ही चुके हैं।

ओंकार द्वारा इन अवस्थाओं का ही प्रकट किया जाता है।




१) Some Aspects of the Philosophy of Sakta tantra

२) शक्ति-अंक (कल्याण) में कविराज जी ने त्रिकोण स्थित बिन्दु को शिव रूप। भी कहा है यद्यपि 'बिन्दु'

पैसा हा चंचल आहे, येतो आणि जातो.

सर्वदा शक्ति सहित है। त्रिकोण योनि है विन्दु शिव का विन्दु (वीर्य) - (द्रष्टव्य-शक्ति अंक, पृष्ठ ५८)।

सम्पूर्ण जगत् इसी त्रिकोण और विन्दु से ही उत्पन्न होता है। पुरूष का मिलन भी इसी की पुनरावृत्ति मात्र है।

शक्ति त्रिकोण

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| सृष्टि | रक्षा | नाश |
| वामा | ज्येष्ठा | रौद्री |
| इच्छा | ज्ञान | क्रिया |

ॐ व शक्ति संबंध

रामपूर्णतापनीय उपनिषदात 'वटबीजाचे' उदाहरण दिले आहे.

''कारणत्वेन चिच्छक्त्या रजस्सत्त्वतमोगुणै:।
यथैव वटबीजस्थ: प्राकृतोयं महाद्रुम:॥

'वटबीजांत ज्या प्रकाराने महावृक्ष सूक्ष्मरूपात विद्यमान रहातो व नंतर उत्पन्न होऊन एका मोठ्या वडवृक्षात परिणाम होतो, तसेच अगदी हे प्राकृत ब्रह्मांड (सर्व विश्व Universe) चित् शक्तिच्या सर्वांगीण सामर्थ्याने उत्पन्न होते.''

आता आपण तंत्र शास्त्रात शास्त्र पंथात विश्वनिर्मितीच्या प्रथम क्रियेत बीज निर्मीती कशी झाली ही संकल्पना पाहू या.

विश्वाच्या सृष्टि विकासाचे मूळ 'सकल ब्रह्म' हे मानले जाते. त्या पूर्वीची अवस्था तत्वातीत मानली जाते. ती अवस्था निष्कल ब्रह्म मानली जाते. शून्य व पूर्णत्व ह्यामध्ये त्या संकल्पना मनासमोर येतात त्या क्रमा. हे 'निष्कल' ब्रह्म 'सकल' बनते तेव्हा ब्रह्मामध्येच अंतर्भूत असलेली 'शक्ति' 'Conscious Energy' ही एक सूक्ष्म स्पंद पावते. ब्रह्माच्या संकल्पनेत शिव व शक्ति ह्या दोन संकल्पनासुद्धा ध्यानांत घ्यावयाला हव्यात. एका निष्क्रिय अवस्थेतून सक्रिय अवस्थेत येण्यासाठी शिव व शक्ति ह्यांचा एक प्रकारचा 'संयोग' होतो. तत्वसंदोह(१)मध्ये त्याचा उल्लेख 'असा' आहे :-

''यदयमनुत्तरमूर्ति निजेच्छया खिलमिदं जगत्स्रष्टुम्।
पस्पन्देस स्पन्द: प्रथम: शिवतत्त्वमुच्यते तज्ज्ञै:॥

आपल्या 'इच्छेने ह्या अखिल सृष्टिची रचना करण्याची कृती ह्या स्पंदनाने सुरू होते. ह्या प्रथम स्पंदाला शिवतत्व म्हणले जाते. त्यानंतर -

इच्छा सैव स्वच्छा सन्ततसमवायिनी सती शक्ति:।
सचराचरस्थ जगतो 'बीजं' निखिलस्यनिज-निलीनस्य॥

(तत्वसंदोह २)

ही 'इच्छाशक्ति - किंवा इच्छारूपी शक्ति तीच आपल्या गर्भात 'बीज' संभाळून आहे

ही शिव आणि शक्ति म्हणजेच सांख्यतत्वज्ञानातील 'पुरुष व प्रकृति.' ही नांवे संप्रदायाच्या वेगळेपणाने जरी निरनिराळी नांवे, त्याच संकल्पनांना देतांना आढळतील. तरी ती एकच तत्वे आहेत.

ह्या शिव+शक्ति किंवा पुरुष+प्रकृति ह्याच्या संयुक्त तत्वाचे नाव 'नाद' हे आहे. ह्या नादाचे स्वरूप ह्या स्थितीला अव्यक्त आहे व म्हणून तो अव्यक्त जगातील 'अव्यक्त नाद' आहे. ही मूळ कल्पना नीट समजून घेतली कीं गणपती अथर्वशीर्षांत 'नादानुसंधानम्' करून 'ॐ गं गणपतये नम:।'' ह्या उच्चारांना मंत्रसामर्थ्य पैदा होऊ शकते.

ही बीज संकल्पना आपण एव्हढ्या विस्ताराने कां तपासत आहोत, हा विचार उद्भवणारच पण, त्याचे उघड कारण हे आहे की, ह्या विश्वाची निर्मीती, रचना व कार्य हे ज्या पध्दतीने चालते, त्यात गोंधळ दिसत नाही तर निश्चित योजना व दिशा दिसते.

अर्थात, इथे हाही प्रश्न निर्माण होतो कीं ह्या विश्वाच्या

*दुसऱ्याने मोठा बनवलेला माणूस हलका असतो.*

रचनेचा विचार कोण करतो? कुणाची क्षमता आहे? हीच आहे 'ब्रह्मजिज्ञासा'. पण असा प्रश्न पडणे हेही भाग्य असे तोकडे!! कारण, इतर पशूपक्षी जीवांना हे प्रश्न पडतांना दिसतील किंवा पडू शकतील, हे जाणवत नाही. आद्य शंकराचार्य म्हणून म्हणतात, ''अथातो ब्रह्म-जिज्ञासा''. परंतू खरा 'यक्ष प्रश्न' आहे कीं ह्या मानवाची निर्मिती ही सुध्दा ह्या विश्वरचनेचाच भाग आहे. मग ह्या मानवी देहाच्या रचनेत जे त्याचे मन, बुध्दी अहंकार, अंत:करण, व इतर अनेक भाग आहेत, त्यांच्या ज्या 'पूर्ण स्वरूप संकल्पना' आहेत, त्या काही मानवाने निर्माण केलेल्या नाहीत, तर सर्वसाधारणपणे 'मानव योनीमध्ये' जन्मणाऱ्या प्रत्येक 'जीवात्म्याला' ही यंत्रणा ''Freeware Software'' ह्या कॉम्प्यूटर क्षेत्रातील प्रकारासारखी फुकट वापरावला मिळाली आहे आणि ती देखील जन्मसिध्द अशा अवस्थेत एवढेच नव्हेतर ह्या देहाच्या सूक्ष्म अंतरंगाचा शोध घेऊन नाथपंथीयांनी जी तांत्रिक यंत्रणा शोधून वर्धिष्णू केली, तिची योजना 'पूर्णावस्थेत अंतरंगात' उपलब्ध होती. त्यांतील एक 'कुंडलिनी शक्ति' जी सुषुम्ना नाडी, सरस्वती नदी सारखी निद्रिस्त अवस्थेत आहे, मानवाला ती जागृत करून स्वत:ला 'पारलौकिक ज्ञान' मिळण्यासाठी जागृत व उपयोगात आणण्याची क्षमता बहाल केली आहे. पण हरी नारायण आपटे ह्यांच्या कादंबरीसारखे 'पण लक्षात कोण घेतो?'

**वैशिष्ट्यपूर्ण प्रश्नोपनिषद :**

प्रश्न आहे कीं ही योजना कशासाठी असावी? अनेक उपनिषदात एक 'प्रश्नोपनिषद' आहे. महत्वाची गोष्ट ही आहे कीं प्रश्न पडणे व त्याची उत्तरे मिळणे ही एक भाग्यशाली मानवी क्रिया आहे. मग, ह्या प्रश्नांची एक वेगळी जातवारी आहे हे लक्षांत येईल.

''तान्ह स ऋषिरुवाच भूय एव तपसा ब्रह्मचर्येण श्रध्द-सा संवत्सर संवत्स्यथ यथाकाम प्रश्नानपृच्छत यदि विज्ञास्याम: ह वो वक्ष्याम इति''॥२॥

**प्रश्नांची जातवारी :**

भारद्वाजांचा पुत्र सुकेशा, राजा शिबिचा सुपुत्र सत्यकाम, गर्ग, गोत्रोत्पन्न सौर्यायणी, आश्वलायन, भार्गव आणि कबंधी हे सहा ऋषी ब्रह्मनिष्ठावान होते व ते त्यांच्या ईश्वरशोध, ब्रह्मज्ञानाची जिज्ञासा बाळगून व हातात समिधा घेऊन पिप्पलाद ऋषींकडे गेले. त्या ऋषिंना पिप्पलाद म्हणाले कीं, आपण श्रध्दापूर्वक, ब्रह्मचर्यपूर्वक तप करीत एक वर्ष रहा व नंतर आपआपल्या प्रत्येकाच्या जिज्ञासा बरहुकूम मला प्रश्न विचारा. जर माझ्यापाशी ते ज्ञान असेल तर मी नक्की सांगेन'' काय ह्या संवादाचा मतीतार्थ? इथे उपनिषद्कार भौतिकवादी निसर्गदत्त मानवी रूपाला पडणाऱ्या प्रश्नांची पातळी उंचावण्याची यंत्रणा सांगताहेत. कारण नाशिवंत भौतिक स्तरावर असलेल्या चेतन जीवात्म्याला पडणारे प्रश्न हे त्याच्या भौतिक स्तरावरचे असतात- उदाहरणार्थ ''इनकम टॅक्स चा रिफंड, देवा कधी मिळेल?'' तर इथे फक्त अर्थमंत्री चिदंबरमस्वामी व पंतप्रधान मनमोहनसिंग हे प्रसन्न व्हावे लागतील नव्हे काय? पण, जेव्हां ह्या जीवात्म्याची चेतनपातळी ही आध्यात्मिक स्तरावर जाईल तेव्हां भगवद्गीतेतील अजेंडा (जीवन उद्दिष्टे) हा व पडणारा प्रश्न ''उध्दरेत् आत्मनाऽऽत्मानं'' ((भगवद्गीता पा. ६ श्लोक ५) ह्या जातीचा असेल आत्म्याचा उध्दार स्वत:च्याच प्रयत्नाने! पण, ही उंची-श्रध्दा-म्हणजे 'आत्मवाक्यावर विश्वास' व ब्रह्मचर्य म्हणजे 'वीर्य शक्तीचा', भौतिक सुखासाठी निष्कारण व्यय होण्याऐवजी, ती शक्ती 'सहस्रार चक्रात' घडणाऱ्या यज्ञ यंत्रणेने चेतन शक्तीची उंची वाढवण्याकडे चालेल; आणि हे सर्व अग्नि; ह्या वैधिक शक्तीच्या सामर्थ्याने (ज्वल ज्वल प्रज्वल - ह्या मंत्राने) तप साधनेने उंचावेल. ही केमिस्ट्री भौतिकातील लॅबोरेटरीसारखीच सहस्रार चक्राच्या स्थानी यज्ञकुंडातील क्रियांसारखी आणि उध्वरीत झालेल्या शक्तीस्वरूप आज्य स्वाहाकाराने घडेल. ह्या गोष्टी केवळ Textual knowl-

*लाकडातील विस्तव लाकूड पेटल्याशिवाय जाणवत नाही.*

edge च्या प्रांतातील नव्हेत, तर त्या उर्ध्वरीत साधना (दिशाचे जुन्या अंकातील माझे लेख वाचा) ह्या 'यज्ञक्रियेने' होणार आहेत!!

ह्यानंतर ह्या ६ ऋषींची प्रश्नांची पातळी ही स्वाभाविकपणे उंचावलेली आढळेल. पण, हे काही conditioning किंवा Regimentation नव्हे, तर हा प्रयत्न करणाऱ्या ऋषीला दोन्ही पातळीवरील ज्ञानाचा एक एकात्म Integral दर्शन करण्याचे सामर्थ्य प्राप्त करून देतो. कारण शरीर हे भौतिक स्तरावर 'इंद्रियजन्य ज्ञान' जाणण्याच्या क्षमतेवर असेलच व ते दर्शन प्रकृतितील भौतिक ज्ञानाच्या पातळीवरचे असेल, पण त्या ज्ञानाचे परिवर्तन आध्यात्मिक उंच स्तरावरच्या ज्ञानात होऊन स्वत:च्या आत्मिक उन्नतिकरिता जे प्रश्न आतां पडतील त्या स्तरावरचे असेल. त्यामुळे याची Human Progress व्याख्या 'रोटी, कपडा, मकान'' ह्या प्राथमिक गरजेच्या पातळीवरून उंचावून 'ब्रह्मज्ञानाची जिज्ञासा' ह्या स्तरावर जाईल. एरव्ही नाही - त्रिवार नाही!! कारण, ह्या पातळीवर न जाता मिळवलेल्या ज्ञानाची पातळी ही ज्ञानेश्वरीच्या पैठणमधील प्रसिध्द रेड्यासारखी बडबड व प्राणी स्तरावरील प्रत्यक्ष जीवन अशीच राहील त्यात खरा 'आत्मिक बोध' असणार नाही.

आतां, ह्या तपस्येनंतर ह्या 'वेदबीजाच्या' अंतर्गत सूक्ष्म ज्ञानबीजाला अंकुर फुटतील व मानवी संस्कृतीचा हा 'अश्वत्थ' आणि न्यग्रोध (पिंपळ व वड) विस्तारेल व त्याला उच्चसंस्कृतीची फळे लागतील.

दुर्दैवाने, ह्या भारतीय वैदिक संस्कृतीने ज्या मानवी संस्कृतीची ही जाति-वृक्षारोपण केले, त्याची जाणीव ह्या आधुनिक युगांत नष्ट झाली आहे.

त्या संस्कृतीची ओळख स्पष्ट नसल्याने सामाजिक, आर्थिक, राजकीय स्तरावर तिचा ठसा नष्ट झाला आहे. त्यामुळे ह्या युगांत जन्मलेल्या जीवात्म्यांना ह्या संस्कृतीतील उन्नत ज्ञानाचा प्रभाव आपल्या आत्म्यावर पडावा हे साध्य होणार नाही.

त्यामुळे ह्या अध:पतनाची जबाबदारी समाजधुरीण नेत्यांना पेलावी लागेल व ह्या गुन्ह्याकरीता त्यांना 'स्पिरीच्यूअल वैश्विक न्यायसंस्थेकडून' जी शिक्षा भोगावी लागेल तिला तोंड द्यावे लागेल हे निश्चितच!!

मग ह्या भारतीय संस्कृतीची मानवी संस्कृतीची भौतिक धारणा कोणती व आध्यात्मिक धारणा कोणती ह्याचा विचार आपण दिशाच्या पुढील कांही अंकातून करणार आहोत.

॥ कृष्णार्पणमस्तु ॥

श्री. यशवंत साने
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी, अग्यारी लेन, ठाणे.
Tel. 25368450
E mail;: yrsane@eth.net



THE SPEAKING TREE

न्यग्रोध (वड)

साहित्य जगत

# वाचावीत अशी पुस्तके

*निष्ठेने ग्रंथ प्रसार करणारे श्री. शरद जोशी दिशाचे हितचिंतक आहेत. त्यांचे ग्रंथप्रसाराचे काम अनेक वर्षे चालू आहे. दिशासाठी 'साहित्य जगत' मधून त्यांनी करून दिलेल्या हा ग्रंथांचा परिचय - संपादक*

## शिक्षणातील चांगले काही

### (रेणू दांडेकर यांचे उपयुक्त पुस्तक)

लेखिकेचा परिचय :

रेणू दांडेकर (मु. पो. चिखलगाव, ता. दापोली, जि. रत्नागिरी - ४१५७१२; हे एक मनस्वी व्यक्तिमत्त्व आहे. १९८४ पासून लोकमान्य टिळक विद्या मंदिर चिखलगाव येथे मुख्याध्यापिका. बालभारती (इ. १ ली ते ५ वी मराठी पाठ्य पुस्तक संपादन समिती सदस्या, बालचित्रवाणी शैक्षणिक तंत्रज्ञान, (वरळी) विशेषज्ञ महाराष्ट्र राज्याच्या अनेक शैक्षणिक समित्यांच्या सदस्या, 'भारतीय शिक्षण' या दिवाळी अंकाचे तीन वर्षे संपादन, 'रुजवा', 'कणव', 'मुलांशी बोलतांना', 'आता शाळेत जायचं', 'गाणी मुलांची झाडांची', 'तुली आई आहे', 'घरट्याच्या गोष्टी' इ. अनेक पुस्तके प्रसिद्ध. आणा कामतकर पुरस्कार, तेजस पुरस्कार (टिळक नगर शिक्षण संस्थ, डोंबिवली), आदर्श शिक्षक पुरस्कार, बाया कर्वे पुरस्कार (२००५) पुणे इ. अनेक पुरस्कार प्राप्त. साहित्य संमेलने, आकाशवाणी, महाविद्यालये, अनेक संस्था इ. ठिकाणी व्याख्याने. महाराष्ट्र टाईम्स, सकाळ, लोकसत्ता, लोकमत, केसरी इ. दैनिकांतून लेखमाला अमेरिका, कॅनडा, जर्मनी या देशांत व प्रवास. पती डॉ. राजा दांडेकर यांच्या सहकार्याने अनेक सामाजिक कार्यात सहभाग.

शिक्षणातील चांगले काही :

२९-११-२००५ रोजी प्रफुल्लता प्रकाशनाने (१३-अ, 'कामेत', प्लॉट नं. ८८, रामबाग कॉलनी, पौड रोड पुणे - ४११०३८) त्यांचे; 'शिक्षणातील चांगले काही' हे सुंदर पुस्तक (पृ. १२८, मूल्य रु. ९०/-) प्रसिद्ध केले. आजपर्यंत शिक्षणाबद्दल जेव्हा जेव्हा लिहिले गेलं, तेव्हा तेव्हा शिक्षक आणि विद्यार्थी याबद्दल लिहिले. त्यांच्याशी निगडित अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके उपक्रम, रचना याबद्दल लिहिलं गेल. पण स्वायत्त संस्थेबरोबरच स्वयंसेवी संस्था म्हणजे शाळा चालविणाऱ्या संस्था, शाळेतील चतुर्थ श्रेणीवर काम करणारा शिपाई, शाळेचा लेखनिक, शाळांचे मुख्याध्यापक या सजीवांबरोबरच इमारती, क्रीडांगण, वाचनालय, प्रयोगशाळा या निर्जीव वास्तू तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत. फक्त शिक्षक आणि विद्यार्थी एवढ्यानेच शाळेला अकार मिळतो असं नाही. तर वरील इतर घटकांमुळे ही आकार मिळतो. ते ही घटक महत्त्वाचे आहेत. त्या दृष्टीने लिहिलेले हे पुस्तक आदर्श आहे. (असा विचार करून लिहिलेली काही पुस्तके सन्माननीय म्हणून अपवाद असलेली पुस्तके असतीलही.)

पुस्तकाचे अंतरंग :

'आकार', 'असावी शाळा आपली छान', 'आम्ही रक्षक शाळेचे : शिपाई', 'आम्ही शिल्पकार भविष्याचे : शिक्षक', विकासाचा केंद्रबिंदू मुख्याध्यापक इ. प्रकरणांतून लेखिकेने उत्तम आणि उपयुक्त माहिती दिलेली आहे. आपल्या 'मनोगता'त त्या म्हणतात, ''शाळा म्हटली की तिच्याशी निगडित अनेक घटक असतात. काही प्रत्यक्ष काही अप्रत्यक्ष. या घटकांच्या एकजिनसीपणातून एकरूपतेतून शाळेला वेगळाच आकार मिळतो. आपल्या सर्वांच्या जीवनाला आकार देणारी शाळा ही एक रचना आहे. आकृती आहे. तिचे आकार 'व्यक्ती तितक्या प्रकृती' प्रमाणे विभिन्न आहेत...

... मी भाग्यवान आहे. अनेक ठिकाणी मला फिरावयास मिळाले. सगळा चांगलेपणा, सज्जनपणा मला

*अभिषेक झाला नाही तरी, सिंह हा जंगलाचा राजाच म्हणवला जातो.*

एके ठिकाणी पाहायला नाही मिळाला. पण अनेक शाळा - शाळांतून शाळेशी निगडित असलेल्या अनेक घटकांतून हा चांगलेपणा जाणवला. तो टिपून घेतांना मला मोठी प्रेरणा मिळाली. या विचारातूनच या पुस्तकाची निर्मिती झाली...'' शाळाशाळांतून खूप काही चांगल घडण्यासाठी या पुस्तकाचा मोठा उपयोग होणार आहे. शिक्षण क्षेत्रातील आपल्या संस्थासाठी लाभदायक ठरणार आहे.

●●●

## स्टॉप वॉच

### (अनियमित दिनचर्या आणि आरोग्य)

**अनियमित जीवनशैली :**

सौ. स्नेहल संजय गोविलकर आणि संजय गोविलकर या दांपत्याने लिहिलेले व त्यांच्याच जीवनरंग प्रकाशन या संस्थेने (३८/९६७, आदर्शनगर, श्रमिक सोसा. आदर्शनगर, वरळी मुंबई - ४०००३०) प्रकाशित केलेले स्टॉप वॉच हे एक झकास पुस्तक आहे. (पृ. २१८, मूल्य रु. २५०/-)

**विवेचक :**

'माझा साक्षात्कारी हृदयरोग' हे अप्रतिम पुस्तक लिहिणारे डॉ. अभय बंग (शोधग्राम गडचिरोली) यांनी या पुस्तकास प्रस्तावना लिहिली आहे. ते म्हणतात, ''हा एक नवा विषय आहे. गडचिरोलीतला आदिवासी किंवा शेतकरी सूर्याच्या आधाराने आपली दिनचर्या जगतो, पहाटे उठतो, दिवसभर काम करतो आणि सूर्य मावळून अंधार झाल्यावर तासदोन तासात झोपी जातो. त्याच्या जागण्याचं व झोपण्याच घड्याळ सूर्याशी निगडित आहे. पण एडिसनने विजेचा दिवा शोधला आणि दिवस रात्रीतला फरक नाहीसा केला! शहरीकरण औद्योगिकीकरण आणि जागतिकीकरण यामुळे माणसाच्या जगण्याचं घड्याळ सूर्याधारित दिनक्रमापासून वेगळ झालं, अनियमित झाल. त्याच शरीर जैविक दृष्ट्या सूर्याशी निगडित आहे. पण रोजच्या दिनक्रमाची जैविक घड्याळाशी फारकत झाली आहे. अशी अनियमित दिनचर्या हीच नियमित बाब व्हावी इतक्या मोठ्या प्रमाणात शहरातील अनेक लोकांची दिनचर्या आज बदललेली आहे. रात्रपाळी असणारी अनेक काम व व्यवसाय निर्माण झाले. ही माणसं रात्रभर जागून काम करताता व दिवसा झोपतात. शिवाय परीक्षांचा अभ्यास, टी व्ही , सिनेमा आणि रात्री चालणाऱ्या पार्ट्या आहेतच...''

**अनेक वर्ष करून अभ्यास / पाहणी केली :**

श्री. संजय गोविलकर हे पोलीस उपनिरीक्षक म्हणून गेली १४/१५ वर्षे महाराष्ट्र पोलीस दलात कार्यरत आहेत. पोलीस दल वा इतर कस्टम्स, एअर लाईन्स, ड्रायव्हर्स, तिन्ही शिफ्टमध्ये काम करणारे औद्योगिक कामगार आहोरात्र काम करून आपल्या मुंबईला व पर्यायाने देशाला, घड्याळाप्रमाणे २४ तास निरंतर कार्यरत ठेवतात; परंतु या कामासाठी दक्ष असणारी ही मंडळी त्यांच्या आरोग्याबाबत झोपेबाबत व्यायामाबद्दल मात्र बेफिकीर असतात. त्यामुळे त्यांची व्यसनाधीनता वाढत जाते. बहुतेक जण आजारी पडल्यानंतर औषधोपचाराकरिता डॉक्टरकडे जातात. परंतु आजार होऊच नये म्हणून कोणी जास्त खोलात जाऊन विचार करीत नाहीत. अनियमित जीवनशैलीमुळे त्यांच्या सामाजिक, कौटुंबिक व शारीरिक जीवनावर विपरीत परिणाम होतात इथेच गोविलकरांच्या मनामध्ये ह्या साऱ्या पद्धतीत काही तरी बदल झाला पाहिजे असे आले. सुदैवाने त्यांची पत्नी सौ. स्नेहल आहार शास्त्राच्या विशेष अभ्यासक आहेत. तिच्याशी, भरत दाभोळकरांसारख्या अनेक मित्रांशी चर्चा केल्या एवढेच नव्हे तर अनेक डॉक्टरांच्या सहकार्याने त्यांनी जोरदार विचार मंथन केले व जवळ जवळ ५५० लोकांकडून प्रश्नावल्या भरून घेऊन त्याचा अभ्यास केला. पुस्तकाच्या शेवटी जी संदर्भ ग्रंथांची यादी दिली आहे. (एकूण २२ पुस्तके) त्यांचा कसून अभ्यास केला. त्यांतून जे नवनीत निघाल ते म्हणजे प्रस्तुतचे पुस्तक स्टॉप वॉच.

*सूर्य उगवला की काजवे आणि चंद्र प्रकाशू शकत नाहीत.*

**पुस्तकाचे अंतरंग :**

पुस्तकाच्या एकंदर २५ प्रकरणांतून (त्यांच्या नावावरूनच आपल्याला प्रश्नाचे गांभीर्य समजते. उदा.- जीवनशैली अनियमित करणारे घटक अनियमितमुळे उद्भवणारी व्यसनं, फालतू गप्पा किंवा गॉसिप्स, अनियमित दिनचर्य व व्यायाम इ.) या सर्व प्रकरणात उपयुक्त माहिती दिलेली आहे. सध्याच्या काळात दिनचर्या या जीवनशैली बदलणे हे अपरिहार्य असले तरी जे ताणतणाव निर्माण होतात, आरोग्य बिघडते त्यावर कोणती काळजी घ्यावी, कोणती उपाययोजना करावी याचे मार्गदर्शन लेखकाने ह्या पुस्तकात केले आहे. त्याबद्दल लेखक अभिनंदनास पात्र आहे. प्रत्येकाने हे पुस्तक वाचावेच असा आग्रहाचा सल्ला द्यावासा वाटतो.

•••

## 'दिव्यस्पर्शी'

### (अद्भुत व्यक्तिमत्त्वाचे कै. डॉ. राम भोसले यांचे अविस्मरणीय चरित्र)

एक राजमान्य योगी, एक स्वयंप्रकाशी व्यक्तिमत्त्व, हिमालयात महावतार बाबाजींच्या दिव्यस्पर्शाने ज्यांना अतिंद्रिय शक्तींचा लाभ झाला आणि ज्यांच्या दिव्यस्पर्शाने जगातील अनेक जण रोगमुक्त झाले. जे अगदी लहान वयात सर्वार्थाने प्रतिकूल परिस्थितीत असलेले पुढे जगातील सर्वश्रेष्ठ मसाजिस्ट बनले. म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, स्टॅलिन, आयसेन हॉवर बार्नार्ड शॉ, योगी अरविंद यांच्यासारख्या अनेक मान्यवरांना ज्यांच्या मसाजाने आराम दिला आहे, ज्यांची हिमालयात सहा वर्षे योगसाधना झाली, साक्षात महावतार बाबाजी ज्यांना गुरू म्हणून लाभले, ते डॉ. राम भोसले त्यांचे 'दिव्यस्पर्शी' हे चरित्र आहे.

**प्रेरणादायी जीवनकहाणी :**

न्या. धनंजय देशपांडे यांनी डॉ. राम भोसले यांच्या जीवनावर लिहिलेली ही चरित्रमय कादंबरी आहे. अद्भुत रसाने भरलेली जीवनकहाणी प्रत्येकाला मोठी प्रेरणा देणारी आहे. 'दिव्यस्पर्शी'ची पहिली आवृत्ती २००३ साली प्रसिद्ध झाली. २००५ मध्ये दुसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली. (पृ. २४८, मूल्य रु. २२५/-) थोड्याच कालावधीत तिसरी आवृत्तीही संपली आणि जाने. ०८ मध्ये प्रसाद प्रकाशना (१८९२, सदाशिव, पुणे - ३०) च्या हीरकमहोत्सवी समारंभात त्याची चौथी आवृत्ती मोठ्या दिमाखात प्रसिद्ध झाली. या सर्व आवृत्त्या प्रसाद प्रकाशनाचे सर्वेसर्वा श्री. मनोहरपंत तथा बापू साहेब जोशी यांनीच प्रसिद्ध केलेल्या आहेत. श्री. जोशी आपल्या निवेदनात म्हणतात, ''न्या. धनंजय देशपांडे यांच्याबरोबर मी डॉ. राम भोसले या अद्भुत राजयोग्याचे दर्शन घेतले. त्यांच्या दर्शनास गेलो तेव्हा त्यांना सांगितले की, मी आपले दर्शन घेण्यासाठी आलो आहे, भेटण्यासाठी नाही. अतिशय मनमोकळे व दिलखुलास असेच हे व्यक्तिमत्त्व आहे. एका माणसाच्या आयुष्याचा सर्वच रंग इतके अद्भुत असावेत, हे एक परमेश्वरी अद्भुतच आहे. इतके अद्भुत की त्यावर विश्वासच बसू नये. ज्ञानेश्वर माऊलींच्या शब्दात सांगायचे तर 'ऐसी अद्भुत तेजोराशी। तो नवल म्या देखिलासी॥'

**अप्रतिम चरित्रात्मक कादंबरी :**

एकूण ४७ प्रकरणांतून लेखकाने डॉ. राम भोसले या व्यक्तिमत्त्वाचा अद्भुत रंजक आणि प्रेरणादायी प्रवास रेखाटला आहे. एकदा वाचावयास घेतले की ते पुस्तक वाचून संपविल्याशिवाय वाचकाला खाली ठेवताच येणार नाही. एक अप्रतिम चरित्रात्मक कादंबरी लिहून मराठी साहित्यात मोलाची भर घातल्याबद्दल न्या. देशपांडे यांचे व प्रकाशक मनोहरपंत जोशी (प्रसाद प्रकाशन) यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

श्री. शरद जोशी
(ग्रंथ प्रसारक)
सी / ५, अमर कल्पतरू को. हौ. सो.,
देवी चौक, शास्त्री नगर,
डोंबिवली (प.) - ४२१२०२.

# व्यक्तिमत्त्व विकास - काळाची गरज

*व्यक्तिमत्त्व व व्यक्तिमत्त्व विकासाचे घटक यांबाबतचा हा लेख- संपादक*

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे व्यक्तिमत्त्व विकास हा विषय नव्याने अभ्यासक्रमात सुरू झाला. शालेय विषयात आणि तासिकेत भर पडली. पण या विषयाची खूपच आवश्यकता आहे. कारण हा विषय केवळ उदाहरणांनीच शिकविला जाऊ शकतो. म्हणजे शिक्षकांनी स्वत:च या विषयाचे जिवंत उदाहरण अर्थात आदर्श म्हणून विद्यार्थ्यांसमोर दिसत राहिले पाहिजे, असा दृढविश्वास ठेवूनच या विषयाची भर शालेय विद्यार्थ्यांवर पडली आह. व्यक्तिमत्त्वाचा विकास हे मुळी शिक्षणाचे ध्येयच मानले जाते. शिक्षणाने व संस्काराने प्रत्येक व्यक्ती विचार करण्यास, मत बनविण्यास समर्थ होते. प्रत्येक व्यक्तीला काही मूल्य आहे व व्यक्तीला विकासासाठी संधी व स्वातंत्र्य असले पाहिजे. या तत्त्वावरच लोकशाही जीवनपद्धतीची उभारणी झाली असल्याने लोकशाही यशस्वी करण्यासाठी व्यक्तिपरिचयाची गरज निर्माण होते. तसेच व्यक्तिमत्त्व हे विकास पावत असते, विकसनशील असते. व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय व परीक्षा शेवटी सामाजिक वातावरणातच होते.

### व्यक्तिमत्त्वाची व्याख्या :

'व्यक्ती तितक्या प्रकृती' किंवा 'कोणाच्याही हाताची पाच बोटे सारखी नसतात' किंवा 'पिंडेपिंडे मतिर्भिन्ना' अशी अनेक वचने आपण ऐकतो किंवा वाचतो. म्हणजेच प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व हे इतरांच्या व्यक्तिमत्त्वाहून भिन्न असाते. प्राचीन ग्रीक काळातील काही विशिष्ट लॅटिन शब्दांपासून Personality किंवा व्यक्तिमत्त्व हा शब्द तयार झालेला आहे. Persona या शब्दापासून Personality या शब्दाची व्युत्पत्ती झाली.

अनेक मानसशास्त्रज्ञांनी या संकल्पनेची व्याख्या केलेली आढळते. नॉर्मन, मन् या मानसशास्त्रज्ञाने इंग्रजी भाषेत 'व्यक्तिमत्त्व' या संकल्पनेची पुढील व्याख्या केली. ''व्यक्तिची शरीरयष्टी, वर्तनशैली, अभिवृत्ती, आवडी, क्षमता आणि अभियोग्यता यांचे वैशिष्ट्यपूर्ण संघटन म्हणजे व्यक्तिमत्त्व होय.'' तर गॉर्डन ऑलपोर्ट म्हणतात, ''कोणत्याही व्यक्तीचे बाह्य परिसराशी वैशिष्ट्यपूर्ण समायोजन ठरविणारे गतीशील संघटन म्हणजे व्यक्तिमत्त्व होय.'' यावरून व्यक्तिमत्त्व हे अनेक गुणांनी बनलेले असते. या गुणांचे संघटन व्यक्तीमध्ये झालेले असते. त्याची जडणघडण शालेय जीवनात या विषयाच्या माध्यमातून सरकारने केले आहे. व्यक्तिमत्त्वाची घडण, संपन्न व्यक्तिमत्त्वाचा विकास व्यक्तीची अनुवंशिकता, लाभलेले कौटुंबिक वातावरण, शालेय वातावरण, सांस्कृतिक परिस्थिती, मूल्य अशा अनेक गोष्टी व्यक्तिमत्त्व घडविण्यास जबाबदार असतात.

### व्यक्तिमत्त्व विकासातील घटक आणि त्याची आवश्यकता :

+ **मूल्यशिक्षण :**

जीवन सुनियंत्रित करणारे अनुशासन म्हणजे मूल्य. वसुधैव कुटुंबकम्, सुसंवाद, आदर (शिक्षक व पालकांविषयी) पोषाखाचे संकेत, बुद्धीचा यथोचित उपयोग, शरीर उत्कृष्टपणे कारणी लावणे, कोणतेही काम मनापासून करणे. हे सर्व कार्य आतून प्रेरणा मिळाली म्हणून करणे म्हणजे व्यक्तिमत्त्व विकास.

✛ **ताणतणाव मुक्ती :**

'पहावे आपणासि आपण। या नाव ज्ञान॥', 'मीच माझ्या जीवनाचा शिल्पकार' होणे, स्वत:लाच स्वत:ची ओळख पटणे म्हणजे ज्ञान. तणावाच्या नियंत्रणासाठी ह्याची आवश्यकता आहे.

✛ **उपक्रमशीलता :**

प्रत्येकजण उत्तम नियोजक, व्यवस्थापक, उद्योजक वगैरे सुप्त गुणवत्तेचा असतोच, छंदिष्ट असतो. याची व्यवहार्यता समजणे म्हणजेही व्यक्तिमत्त्व विकसित करणे आहे. उदा. कारखान्यात ज्ञानाचा योग्य वापर, काम करण्याची नेमकी पद्धत, त्यामुळे लाभलेले यश, यश:प्राप्तीचा आनंद आणि तरीही कार्य करत राहण्याची वृत्ती.

✛ **मानवी हक्कांचे संरक्षण :**

आजचे मानवी जीवन खूप व्यापक झाले आहे. प्रतिष्ठित जीवन जगण्यासाठी हक्काची वाढ, त्यासाठी ज्ञान शिक्षणातून प्राप्त करणे वगैरे हक्कांचे ज्ञान म्हणजेच जागृती होणे यालाच व्यक्तिमत्त्व विकास म्हणावे लागते.

✛ **भ्रष्टाचारविरूद्ध सजगता :**

व्यक्तीच्या, समाजाच्या किंवा राष्ट्राच्या हिताला बाधा आणणारी, देशाच्या कायद्याच्या दृष्टीने गैर ठरणारी अशी कोणतीही कारवाई म्हणजे भ्रष्टाचार. मनुष्य भावनाप्रधान प्राणी आहे. जेव्हा भावना नियंत्रणाबाहेर जातात, तेव्हा अराजकता उत्पन्न होते. भावनात्मक उद्रेकाच्या झटक्यातच बहुतेक सर्व गुन्हे घडतात. भ्रष्टाचाराविरूद्ध जागृतीचा संस्कार दृढ होणे म्हणजेच विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास.

✛ **दहशतवाद विरोधी भूमिका :**

जगात अनेक दहशतवादी संघटना आहेत. राजे लोकांनी आर्थिक विषमतेतून असे दहशतवादी हल्ले सोसले. दहशतवाद म्हणजे मनुष्याला निर्दयपणे नष्ट करणारे हिंसक कृत्य. अशी क्रूरता, निर्दयता यांपासून विद्यार्थी जगत दूर राहणे आणि भय, धास्ती, असुरक्षितता यांना बळी पडणार नाही. अशी प्रत्येकाची जडणघडण म्हणजेही व्यक्तिमत्त्व विकास.

✛ **आपत्ती व्यवस्थापन :**

आपत्ती म्हणजे संकट, की ज्यामुळे मनुष्य जीवन, प्राणी जीवन आणि वनस्पतींचा खूप मोठ्या प्रमाणावर विध्वंस करणे, धोका निर्माण करणे म्हणजे आपत्ती. पूर, भूकंप, आग, दुष्काळ, चक्रीवादळ, त्सुनामी, ज्वालामुखी या नैसर्गिक आपत्ती आणि दहशतवाद, दुर्भिक्ष्य, अपघात अशा मानवनिर्मित आपत्तींवर मात करण्याचे सामार्थ्य विद्यार्थ्यांमध्ये येणे आणि आपत्कालीन उपयायोजनांसाठी सदैव सुसज्ज राहणे म्हणजेही व्यक्तिमत्त्व विकास आहे.

एकूणच व्यक्तींमधील संबंध जाणून घेण्याचा तीव्र भावनेतून, मानवी संबंधांच्या विविध पैलूंचा व समाजाचा सखोल अभ्यास करण्यासाठी हा विषय शालेय पातळीवर महत्त्वाचा ठरतो.

अंगभूत गुणदोषांमुळे विसंवादी बनलेले व्यक्तिमत्त्व सुधारून एक सुरेल, सुसंवादी व्यक्तिमत्व निर्माण करणे, आपल्या अंगच्या गुणांचा विकास करून समाजासाठी त्यांचा अधिकाधिक उपयोग करणे ह्यासारखे महाकार्य दुसरे कोणतेही नाही. आणि ह्या महत्कार्याची पहिली पायरी आत्मनिरीक्षण आहे. हे सारे व्यक्तीच्या भल्याचेच ठरते.

प्रत्येकाच्या अंगी काही ना काही शक्ती ह्या असतातच. त्यांचा विकास करणे आणि स्वत:च्या सुखासाठी व समाजाच्या हितासाठी त्यांचा उपयोग करणे ही गोष्ट पूर्णपणे आपल्या हाती आहे. याची जाणीव या विषयाच्या अध्यापनातून केली जाते. या विषयाच्या

---

*तुमचे काम झाले आहे का, याची मृत्यू वाट बघत नसतो*

अध्ययनातून आपल्या अंगच्या बहुमोल गुणांना अंधारात, सुप्तावस्थेत व निरुपयोगी स्थितीत राहू न देणे म्हणजे आपल्या व्यक्तिमत्त्वाची तपासणी करून येणे म्हणजे व्यक्तिमत्त्व विकासाच्या परीक्षेत उत्तम गुण मिळविणे आहे. आपल्या व्यक्तिमत्त्वामध्ये योग्य बदल घडवून आणणे ह्या गोष्टीला महत्त्व आहे हे प्रत्येक विद्यार्थ्याने अध्ययन करताना लक्षात ठेवावे. व्यक्तिमत्त्वरूपी हिऱ्याला अनेक पैलू पाडणे हेच या विषयाच्या अध्ययन - अध्यापनाची वरास्थिता आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांची समाधानकारक प्रगती हे त्याचे ध्येय आहे.

या विषयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांला यश पदरी पडेल. पण यश मिळाले म्हणून प्रवास संपला नाही. ही तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जीवनाच्या प्रवासाची सुरुवात आहे, मुक्काम नाही. यशस्वी जीवनाचा अंत कधीच होत नाही. यशस्वी जीवनासाठी व्यक्तिमत्त्व विकास साधू या.

सौ. उषा जयंत कळमकर

(मुख्याध्यापिका)

विद्या प्रसारक मंडळाचे

डॉ. बेडेकर विद्या मंदिर, ठाणे

•••

### हे शब्द असेच लिहावेत

- देदीप्यमान
- चतुर्मास
- सुज्ञ
- कुटुंबीय
- पंचाहत्तर
- उज्ज्वल
- सूचीकरण
- अर्थसाहाय्य
- नेहमी
- बुद्धिभेद
- बहिनी
- यंत्रसामग्री
- टिप्पणी
- शेशणाई
- ज्येष्ठ
- रुक्मिणी
- पश्चात्ताप
- माउली
- तात्त्विक

•••

**लेखन साहित्य पाठवण्याचा पत्ता :**

*विद्या प्रसारक मंडळ*

*डॉ. बेडेकर विद्या मंदिर*

*नौपाडा, ठाणे - ४०० ६०२*

*दूरध्वनी - २५४२६२७०*

दि

शा

नियमित

वाचा.

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

# पाप - पुण्य

*पाप आणि पुण्य या संकल्पनांबद्दलचे हे चिंतन - संपादक*

विज्ञान आणि श्रद्धा ह्यांची सांगड घालताना जग अधिक अधिक बुद्धीवादाकडे झुकत आहे, तरी देखील सुंदर, समृद्ध जीवनासाठी श्रद्धा हवी, तसा सारासार विचारही हवा, जीवन मूल्यांचे निकष बदलत आहेत, आणि काळानुसार ते बदलतही राहातील. त्याच प्रमाणे पाप - पुण्याईची व्याख्याही बदलत जाईल.

जे संस्कार लहानपणी झालेले असतात जे आपण लहानपासून पाहात आलो आहोत, जे आपल्याला आवडत असतं त्याचं आकर्षण कधीच पुसलं जात नाही. म्हणूनच ज्या संस्कारामुळे मनाला बरं वाटत ते आपल्या मनात खोलवर जाऊन ठसत असतात. ज्या संस्कारामुळे मनाला प्रसन्नता येते मनातली, कोळिष्टंक झडून जातात, दुसऱ्यांना सांगताना आनंद वाटतो ते पुण्य!

जे कृत्य करताना जीव कचरेल, दुसऱ्यांना सांगताना जीव घाबरेल, अपराधीपणा जाणवेल, काहीतरी लपवण्याचा प्रयत्न होईल, ते पाप. त्याचा त्याग केलाच पाहिजे.

संस्कार जपताना बौद्धिक पातळीवर हे उपचार करताना जिवावर येतं, नकोसं वाटतं, ओझं होतं, परंतु केवळ परंपरा आहे म्हणून करायचं, असं होता कामा नये. पाप - पुण्याच्या निकषांवर तडजोड न करता सारासार विचार करून निरर्थक वाटेल ते टाकून द्यावं, असं धाडस हवं. हे अधिक अर्थपूर्ण वाटेल ते अभ्यासावं, आचारणात आणावं, आपल्या बरोबर दुसऱ्याचा विचार करण्याचे संस्कार अंगी बाळगावेत हे पुण्यच.

त्यासाठी एका हातात टेस्टट्युब, किंवा यंत्राचे चाक, संगणक, तर दुसऱ्या हातात दासबोधासारखे ग्रंथ अशी सांगड घालावी लागली तरी चालेल.

तुम्ही जे काही कराल ते तुमच्या इच्छेवर आहे. तुमची जी इच्छा असते तेच संकल्प तुम्ही करता, जे संकल्प तुम्ही करता तेच कृत्यं तुम्ही करता आणि जे कृत्य तुम्ही करता तेच तर तुमचे कर्म आहे. तुमचे कर्म तुमच्या कृत्यातूनच घडत आहे. पाप - पुण्याचा जन्म आपल्या कर्मातूनच होत आहे.

म्हणूनच, श्रद्धेची जोड असल्यास विचारांना चिंतन, मनन याची जोड मिळते. आपल्यामधील ईश्वरी शक्तींना जागृत ठेवल्यास सद्‌विवेकबुद्धीला चालना मिळून आपल्यात अहंभाव येत नाही, नम्रपणा येतो व एखाद्या गोष्टीचा देवभाग आपण एका अज्ञात शक्तीला सगुण रूप देऊन अर्पण करतो. यात मनाचा मोठेपणा वाढून मानवी मन घडत जाते हेच पुण्य समजावं. पुण्य कधीही मरत नाही. ते अमर आहे.

पापी कोणाला म्हणावं? कष्ट न करता खातो तो, दुसऱ्यांच्या हक्कांची, कष्टाची भाकरी खातो तो, स्वत:ला कळत नसताना दुसऱ्यांला शिकवितो तो. दुसऱ्यांची तहान भूक दिसत असताना जो तोंड लपवून खातो तो, काम झालं की पाठ फिरवतो तो. पापाचे अस्तित्व एक असतं पण विध्वंसक शक्ती हजार बॉम्बची असते. लहान - सहान पापे देखील अतिशय घातक असतात. विज्ञानाचा आधार घेऊन पापाचे समर्थन केले जाते.

पापाचा तिटकारा करावा, त्याग करावा. जग हे पुण्याईवर चालते पापावर नव्हे.

**सौ. मोनिका दिलीप कुंवर**
अंबरनाथ, पूर्व

*सगळ्यांचेच आणि नेहमीच समाधान करणे देवालाही शक्य नाही*

# चीनमधील विज्ञान प्रदर्शनात ठाण्याच्या विद्यार्थ्यांचे यश

*आमच्या संस्थेच्या आनंदीबाई जोशी विद्यालतील विद्यार्थ्यांनी चीनमधील प्रदर्शनात सतत दुसऱ्या वर्षी यश प्राप्त केले. या चीन सफरी बद्दल- संपादक*

देशाच्या प्रगतीत विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे महत्व आता सर्वच देशांनी ओळखले आहे. आपल्या शेजारील चीन देशाने तर हे महत्व चांगलेच ओळखले आहे. देशात सोयी सुविधा निर्माण करणे, उत्पादन वाढविणे, मनोरंजनाच्या सोयी निर्माण करणे या अनेक कामांसाठी चीनने विज्ञानाची कास धरली आहे. भारताप्रमाणेच युवकांची मोठी फळी हे चीनचे बलस्थान आहे. या बलस्थानाचा उपयोग करून घेण्यासाठी आणि युवकांना विज्ञान तंत्रज्ञानाकडे आकर्षित करण्यासाठी चीन दरवर्षी एक विज्ञान तंत्रज्ञान स्पर्धा आयोजित करते. या मालिकेतील २३ वी स्पर्धा उरूम्ची (Urumgi) या शहरात जुलै २८ ते ऑगस्ट ३, या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. चीनच्या उत्तर पश्चिम भागात असलेले हे शहर शिनजंग (Xinjians) या राज्याची राजधानी आहे. आजूबाजूला सर्वत्र वाळवंट आहे. परंतु शहरात मात्र अनेक झाडे आहेत. प्राचीन रेशीम वाटेवर (Silk Route) असलेले हे गाव अनेक ऐतिहासिक आणि प्रेक्षणीय स्थळांनी वेढलेले आहे.

**चीन विज्ञान तंत्रज्ञान संघटना (Chine Association of Science and Technology):**

या स्पर्धेचे आयोजन करते. राज्य स्तरावरील बक्षिसपात्र प्रयोग येथे आणले जातात. त्याचबरोबर काही परदेशी युवकदेखील या स्पर्धेत भाग घेतात. मागील वर्षापासून ठाण्याच्या सौ. ए. के. जोशी इंग्रजी माध्यम शाळेतील विद्यार्थी चीनच्या विज्ञान तंत्रज्ञान स्पर्धेत भाग घेऊ लागले आहेत. चीन विज्ञान तंत्रज्ञान संघटनेच्या निमंत्रणावरून सहा जणांचा एक चमू नुकताच उरूम्चीला जाऊन आला. यात कुमार अमोघ वैद्य, कुमार कुणाल चौधरी आणि कुमार सिद्धार्थ नायर या विद्यार्थ्यांचा समावेश होता. त्यांच्यावरोबर ए. के. जोशी शाळेतील विज्ञान शिक्षिका श्रीमती शर्मिला नायर होत्या. चमूला मार्गदर्शन करण्यासाठी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर आणि होमी भाभा विज्ञान केंद्रातील प्राध्यापक डॉ. सुधाकर आगरकर या चमूबरोबर गेले होते. रविवार दिनांक २७ जुलै रोजी या चमूने मुंबई विमानतळावरून प्रस्थान केले. उरूम्ची हे ठिकाण चीनच्या उत्तर पश्चिम कोपऱ्यात आहे. तेथे पोहोचण्यासाठी या चमूला प्रथम सिंगापूर आणि नंतर गोंचाहु या शहरांतून जावे लागले.

आपल्या प्रकल्पासाठी सौ. ए. के. जोशी शाळेतील विद्यार्थ्यांनी अतिशय साधा पण महत्त्वाचा विषय निवडला होता. 'स्वयंपाकघरातील पाण्याचा पुनर्वापर' असा त्यांच्या प्रकल्पाचा विषय होता. आपण भाजी धुतो, भांडी विसळतो आणि पाणी फेकून देतो. हे लांबून आणलेले आणि स्वच्छ करून आपल्या घरात पुरविलेले पाणी असते. ते असे वाया घालवणे योग्य नव्हे असे या चमूला वाटते. विशेषतः पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष असताना तर हे काम अयोग्यच. या पाण्याचा कसा उपयोग करून घेता येईल यावर त्यांनी विचार केला. त्यांना उत्तर मिळाले, आपल्या प्राचीन परंपरेतून. अजूनही खेड्यापाड्यात आंघोळीचे पाणी, भांडी धुतलेले पाणी परसातल्या झाडांना देण्याची प्रथा आहे. आपणदेखील स्वयंपाकघरातील पाण्याचा उपयोग झाडांना घालण्यासाठी करू शकतो. त्याचबरोबर हे पाणी गाड्या

धुणे, गच्ची साफ करणे अशा कामांसाठी वापरता येते हे त्यांनी दाखवून दिले. मागील सहा महिने हे विद्यार्थी या प्रकल्पावर काम करीत आहेत. स्वयंपाकघरातील पाण्याचे विश्लेषण त्यांनी केले. त्याचबरोबर किती पाणी वाचवता येते हे आकडेवारीने दाखवून दिले.

भारताखेरीज आणखी सहा देश या स्पर्धेत सहभागी झाले होते. त्यांची नावे अशी - थायलंड, कोरिया, हंगेरी, स्वीडन, डेन्मार्क आणि फ्रान्स. या सर्वांमध्ये भारतीय प्रकल्पाकडे गर्दी जास्तच असायची. प्रदर्शनाला भेट देण्याऱ्या अनेकांना इंग्रजीचे वावडे होते तरीही आपल्या विद्यार्थ्यांनी चित्र, तक्ते आणि प्रतिकृती यांच्या मदतीने प्रकल्पाचे महत्त्व समजावून दिले. उरूम्चीच्या जनतेची मनेच त्यांनी जिंकली असे म्हणता येईल. केवळ जनतेची मने त्यांनी जिंकली नाहीत; तर दूरचित्रवाणीच्या सभासदांनी त्यांची विशेष मुलाखत घेतली. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे या विद्यार्थ्यांनी परीक्षकांची देखील मने जिंकली. त्याचा परिणाम असा झाला की भारताच्या या साध्या सोप्या प्रयोगाला विशेष सफलता पुरस्कार (Outstandily Achievement Award)देण्यात आला. चीनमधील एक आदरणीय आणि वयस्कर शास्त्रज्ञ वुई इनियाग (Wui Iniag) यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. टाळ्यांच्या गजरात ठाण्याच्या विद्यार्थ्यांनी व्यासपीठावर जाऊन हा पुरस्कार स्वीकारला.

भारत आणि चीन हे दोन जवळ जवळचे देश. दोघांचेही संख्याबळ मोठे आहे. दोघांनाही मागील अनेक वर्षांची परंपरा लाभलेली आहे. संख्याबळ आणि परंपरा यांच्या आधारे दोन्ही देश आता महासत्ता बनू पाहात आहेत. या कामात स्पर्धेपेक्षा सहकार्याची गरज आहे. विचारांच्या देवाण घेवाणीतूनच हे शक्य आहे. सौ. ए. के. जोशी शाळेतील विद्यार्थ्यांचे चीनला जाणे, तेथील लोकांशी संवाद साधणे हा असा सहकार्याचाच एक भाग आहे. अशा प्रकारची देवाणघेवाण मोठ्या प्रमाणावर होणे आवश्यक आहे.

डॉ. सुधाकर आगरकर

४ अनिल सोसायटी,
नगरपालिका प्रा. शाळेजवळ,
काटे मानिवली, कल्याण (पू.)

●●●



विद्यार्थ्यांसोबत श्रीमती शर्मिला नायर व डॉ. आगरकर

❖ व्ही.पी.एम. दिशा ❖
वर्गणीसाठी संपर्क:
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर, नौपाडा, ठाणे.
दूरध्वनी २५४२६२७०
वार्षिक वर्गणी रुपये २५/- फक्त.

# भाव

*तुमचा आहार हा संस्कारक्षम असतो. म्हणून चांगले खावे, प्रसन्न मनाने खावे. या संबंधाने हे चिंतन- संपादक*

जसे अन्न तसे मन असते. ज्या प्रकारचे अन्न आपण खातो त्यातूनच आपले मन घडत असते. अन्न कोणत्याही प्रकारचे असो, ते अन्न कोणत्या भावनेतून बनवले जाते हे महत्त्वाचे असते. घरामधील गृहिणी जेवण तयार करीत असताना तिच्या मनातील त्यावेळचे भाव महत्त्वाचे असतात. कारण ज्यावेळी ती जेवण बनवत असते/ तयार करीत असते त्यावेळी जर तिच्या मनात राग, द्वेष, अहंकार असेल तर तोच राग, द्वेष आणि अहंकार त्या अन्नामधील प्रत्येक कणाकणात परावर्तित झालेला असतो; आणि तोच राग, द्वेष आपण अन्नासोबत ग्रहण करीत असतो, खात असतो व त्यातूनच आपले मन घडत असते.

मंदिरामध्ये गेल्यानंतर तेथील प्रसाद आपण प्रसन्न मनाने, अगदी आनंदी मनाने खात असतो. कारण प्रसाद तयार करणाऱ्या व्यक्तीची भावना प्रसाद तयार करतांना वेगळी असते. आपल्या मनातील दुःख, चिंता, राग या सर्व गोष्टी बाजूला ठेवून आपण हा प्रसाद देवासाठी तयार करीत आहोत अशी भावना त्यांच्या मनात असते. म्हणून तो अगदी उत्साहित मनाने, आनंदाने बनवत असतो, म्हणूनच तर तो प्रसाद घेत असताना आपल्याला आनंद, प्रसन्न वाटत असते. आपल्या घरीही असेच असते. आई ज्यावेळी आपल्या मुलासाठी जेवण बनवते, त्यावेळीही तिच्या मनातील भावना अशाच असतात. म्हणून तर आईच्या हातची करपलेली भाकरीही आपल्याला गोड वाटते, चविष्ट वाटते. पण आपण हेच अन्न किंवा याच पद्धतीचे जेवण हॉटेलमध्ये घेतले तर? तर तो आनंद आपल्याला मिळत नाही. कारण हॉटेलमध्ये तयार करण्यात आलेल्या जेवणामागे नफा/तोटा याचे गणित असते. जेवण तयार करणाऱ्या माणसाच्या मनात अनेक प्रकारचे विचार असतात. उदा. घरामधील गोष्टींची चिंता, हॉटेलमधल्या समस्या इ. अशा अनेक समस्या मनामध्ये घेऊन तो जेवण तयार करीत असतो. म्हणून त्या अन्नामध्येही त्यासर्व समस्या, चिंता परावर्तित झालेल्या असतात आणि तेच अन्न आपण हॉटेलमध्ये खात असतो. म्हणून तर नकळत आपल्या मनात किती बिल येईल यांची चिंता असते. ही चिंता घरच्या जेवणामध्ये नसते. हॉटेलमध्ये जेवणाचा स्वाद गोड वाटत असेल तरी असे अन्न शरीराला पोषक नसते. ते हानिकारकच ठरते. म्हणून अन्न तयार करणाऱ्या गृहिणीचे अन्न तयार करतांना मनात चांगले भाव असावेत, मनात वाईट भावना नसावी, मन प्रसन्न असावे, आनंदी असावे, क्रोध, द्वेष नसावा. ज्याप्रमाणे जेवण तयार करतांना गृहिणीचे भाव शुद्ध असावेत त्याचप्रमाणे जेवण जेवतांनाही मन प्रसन्न, आनंदी हवे. जेवताना नकारार्थी भावना नसावी, उत्साहवर्धक वातावरण असावे.

जेवण तयार करणाऱ्या व्यक्तीच्या भावना / विचार त्या जेवणात कशा पद्धतीने गुंतलेल्या असतात हे एका उदाहरणाच्या सहाय्याने अधिक स्पष्ट करता येईल. एका श्रीमंत व्यक्तीला रोज संध्याकाळी एक स्वप्न पडायचे. स्वप्नात तो रोज जवळच असणाऱ्या चाळीत/झोपडपट्टीत जाऊन स्वतःसाठी घर विकत घेत आहे असे वाटायचे. अशा प्रकारच्या स्वप्नाने ती श्रीमंत व्यक्ती घाबरून जायची. पुन्हा आपल्या नशीबी गरीबी येते की काय असे सारखे वाटायचे. म्हणून तो रोज चिंता करायचा. एके दिवशी त्याच्या घरातील मोलकरणीने घर विकत घेण्यासाठी त्याच्याकडे (श्रीमंत व्यक्तीकडे) ५०,०००/- रुपयांची मागणी केली. मोलकरीण स्वतःचे घर विकत घेत आहे म्हणून त्या श्रीमंताने आनंदाने ५०,०००/- दिले आणि

त्याच दिवसापासून त्या व्यक्तीच्या पडणारे स्वप्न बंद झाले. कारण त्या श्रीमंत व्यक्तीच्या घरातील मोलकरीण दररोज सकाळ-संध्याकाळ जेवण बनवत असताना तिच्या मनात एकच विचार असायचा तो म्हणजे आपले स्वत:चे घर असावे आणि ते विकत घ्यावे आणि याच विचारातून बनवलेले जेवण ती श्रीमंत व्यक्ती खायची म्हणून त्याला ते स्वप्न पडत होते.

त्याचप्रमाणे, मांसाहारी जेवण खाण्यासाठी आपण एखाद्या सजीव प्राण्याला मारतो आणि त्याचे मांस खातो. परंतु त्या प्राण्याला मारण्यापूर्वी तो खूप घाबरलेला असतो, आपला अंत होणार म्हणून त्याच्या मनात खूप भिती निर्माण झालेली असते. ती भिती किंवा ते भय त्याच्या सर्व शरिरात संचारलेले असते. असे भयग्रस्त मांस आपण खात असतो. असे मांस खाल्याने आपले मन घाबरट होत असते.

आपल्याला पुण्य लाभावे, जीवन सुखी व्हावे, आनंदी व्हावे म्हणून आपण नेहमी पूजा, जप, तप, भक्ती, प्रार्थना करीत असतो आणि दुसरीकडे अशा प्रकारच्या अन्नाद्वारे राग, द्वेष, चिंता, अहंकार सेवन करीत असतो. म्हणून आपण कितीही पुण्य प्राप्त करण्याचा प्रयत्न केला तर अशा प्रकारच्या अन्न सेवनाने त्याची पातळी कमी - कमी होत जाते. जे पुण्य आपल्या खाती जमा होते त्यामध्ये आपोआपच चढउतार होत रहातात. म्हणून शुद्ध भावनेने तयार केलेले जेवण मनात राग, लोभ, मत्सर, अहंकार, आळस, नकारात्मक भाव न ठेवता शुद्ध भावनेनेच खाले पाहिजे.

(सौजन्य - ब्रम्हाकुमारी शिवानी)

श्री. यशवंत माने
ग्रंथालय विभाग,
रुपारेल महाविद्यालय,
माटुंगा, मुंबई - ४०००१६.

•••

## विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

(स्थापना : १ ऑगस्ट १९३५)

**• विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था •**

१) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (प्राथमिक विभाग)
२) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक विभाग)
३) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (प्राथमिक विभाग)
४) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (माध्यमिक विभाग)
५) के. ग. जोशी कला महाविद्यालय व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय
६) बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय
७) वि.प्र. मंडळाचे टी.एम्.सी. विधी महाविद्यालय
८) डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था
९) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन
१०) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन माहिती तंत्रज्ञान संस्था
११) वि. प्र. मंडळाचे प्रगत अभ्यास केंद्र

(मुखपृष्ठावरून)

संपादकीय

## मानवी जनावर

मानवाची 'जनावरां'पासून असलेली भिन्नता येथेच सुरू होते. शरीररचना आणि पेशींमध्ये जरी साम्य असले, तरी मनुष्य आपल्या सहज भावना किंवा प्रेरणांवरती नियंत्रण आणू शकतो, त्यांचा विकास करू शकतो. उत्क्रांतिवाद हा शरीररचना आणि पेशींच्या विकासाच्या क्रमाचा आलेख देतो, पण मानवाच्या भावना किंवा वैचारिक विकासक्षमतेची तो उकल करू शकत नाही. सर्वच सजीवांना भूक असते. बहुतेक सजीव भूक भागल्यावर जास्त खात नाहीत. मनुष्य पोट भरल्यावरही खाऊ शकतो. हा भाग जरी वगळला तरी ते न खाण्याचा किंवा उपाशी रहाण्याचा निर्णय हाही मनुष्यच घेऊ शकतो. म्हणून शाकाहार ही संकल्पना उत्क्रांत समाजाचे लक्षण आहे.

लैंगिक प्रेरणा या कमीअधिक प्रमाणात सर्व सजीवांत सारख्याच असतात. पण त्यावर नियंत्रण आणि त्यांना दिशा देण्याचे काम फक्त मनुष्यच करू शकतो. त्यातूनच त्याची 'जीवनशैली' विकसित होते. म्हणजे स्वैराचारी प्रवृत्ती ही नैसर्गिक प्रेरणांच्या अनियंत्रित उपभोगाचा भाग झाली; तर ब्रह्मचर्य हे या नैसर्गिक प्रेरणांवर मानवाने हेतू पुरःसर किंवा स्वेच्छेने स्वीकारलेले नियंत्रण झाले.

व्यक्ती तसेच व्यापक समूहाचे हित/अहित लक्षात घेऊन समाजाला जी मार्गदर्शक सूत्रे दिली जातात त्यांनाच आपण 'धर्म' म्हणतो. या व्यवस्थेत 'जबाबदार' स्वातंत्र्य आणि 'नियंत्रण' निषिद्ध नसतात. शिवाय यामध्ये एका मानवी आयुष्याचा विचार न करता मोठ्या कालखंडातील अनुभवांच्या संचिताचा विचार केलेला असतो. एखादी व्यक्ती अनियंत्रित वागली तर फारसा फरक पडत नाही. पण संपूर्ण समाजच जर आत्मकेंद्रित होऊन स्वैराचारी झाला तर गोंधळ निर्माण होतो. समाज विनाशाकडे जातो. आपल्या दैनंदिन जीवनामध्येही अपघात होऊ नयेत म्हणून सोईकरता एकेरी वाहतूक आपण स्वीकारतो. त्या व्यवस्थेचा काही जणांना तोटा होत असला तरी, अशी नियंत्रण, ही घालावी लागतातच.

सामाजिक संस्थांची निर्मिती हे सुद्धा 'मानवा'चेच खास वैशिष्ट्य आहे. 'लग्न' ही संस्थासुद्धा मानवनिर्मितच आहे. स्त्री-पुरुष समानतेच्या अतिरेकाचा एक भाग म्हणून पाश्चात्य देशांमध्ये लग्न ही संस्था मोडीत काढण्यात आली. कुमारी मातांचे प्रमाण बेसुमार वाढले. व्यक्तिस्वातंत्र्याच्या भ्रामक संकल्पनेपोटी बाटलीतून बाहेर काढलेला हा राक्षस पुन्हा बाटलीत घालणे आता शक्य दिसत नाही. भारतामधेही डावे, पुरोगामी व कुडमुडे सुधारक यांच्या प्रयत्नांना यश येऊन लग्न संस्था मोडीत निघण्याच्या मार्गावर आहे. 'हिंदु' धर्मामध्ये लग्न हा एक संस्कार आहे, सध्या कायद्याने तो करार आहे. घटस्फोटांच्या आजच्या वाढत्या प्रमाणावर उच्चतम कोर्टाच्या न्यायाधीशांनी केलेली टिपणी म्हणूनच महत्त्वाची आहे. (आजचा हिंदुलग्नासंबंधीचा कायदा घटस्फोट सुलभ करीत आहे.)

माणूस आणि इतर सजीव प्राण्यांमध्ये फरक आहे तो फक्त विवेकक्षमतेचा. ही विवेकक्षमताच माणसाला जबाबदारीची जाणीव देते. अशा जाणीवेतूनच तो संस्कृती निर्माण करतो. परंतु अशा जाणीवा जेव्हा दिसूळ होतात, संवेदना जेव्हा बधिर होतात, तेव्हा 'विकृती' निर्माण होते. आई - वडील आपल्या मुलांचे पालनपोषण जबाबदारीच्या जाणीवेतून करतात. पुढे हीच मुले आपल्या आईवडिलांचे पालन पोषण करतात तेही एका जबाबदारीच्या जाणिवेतूनच. अशा जबाबदाऱ्या म्हणजे

*लोभामुळे पाप करण्याची वृत्ती बळावते.*

त्याग नाही आणि म्हणूनच अशा समाजाला पाळणाघर किंवा वृद्धाश्रमांची गरज लागत नाही. या जबाबदाऱ्या जेव्हा अदृश्य होतात किंवा त्यांचे व्यापारी मूल्यमापन व्हायला लागते तेव्हा पाळणघर आणि वृद्धाश्रम दृश्य व्हायला लागतात. कुमारी माता, वाढते घटस्फोट किंवा वृद्धाश्रमांची गरज ही माणसांनी स्विकारलेल्या जीवनशैलीशी निगडित आहेत. नियंत्रित समाजाला अनियंत्रित करणे एक वेळ सोपे असते, पण अनियंत्रित समाजाला नियंत्रित करणे फारच कठीण असते. अनियंत्रित पेशीची वाढ कर्करोगाकडे जाते की जिचा अंत हा विनाशातच असतो.

वानर आणि मानव यांची शरीररचना समान असली तरी त्यांची संस्कृती भिन्न आहे. प्राणवायूच्या अणूंची रचना जरी सर्वत्र सारखी असली तरी विरळ प्राणवायू जीव कासावीस करतो. गरजा, क्षमता, अनुभव या सर्व स्तरावर प्रत्येक मानव भिन्न आहे. सांस्कृतिक समानता त्यांच्यावर लादणे म्हणजे सर्वांवर सारखा अन्याय करणे. पाश्चात्यांच्या जंगली भांडवलवाद आणि साम्यवादांनी निर्माण केलेली 'अधिकारां' ची आणि 'मुक्ती'ची भूते संतुलित समाज निर्माण करू शकत नाहीत.

पाश्चात्य जीवनशैलीचे अंधानुकरण करणाऱ्या भारतीय समाजाला जेव्हा याची जाणीव होईल तो सुदिनच म्हणावा लागेल. नाहीतर शतकानुशतकांच्या प्रयत्नातून वेगळा केलेला 'मानव' पुन्हा 'जनावर' व्हायला वेळ लागणार नाही.

(सद्धर्म त्रैमासिक वर्ष ४३/अंक १ - जुलै २००८ वरून साभार)

(टिप : सद्धर्म या त्रैमासिकाचे संपादक माननीय डॉ. विजय वेडेकर हे असल्याने, हे संपादकीय उपरोक्त सद्धर्मवरून घेतले आहे. - कार्यकारी संपादक)

## पाणी कोठून येते?

मुंबईला होणारा ४ हजार दशलक्ष लिटर पाणीपुरवठा ही दैनंदिन गरज भागवतो. नाशिक व ठाणे जिल्ह्यातून तसेच मुंबईतील तलावांतून येणार हे पाणी ४ हजार किलोमीटर लांबीचा जलवाहिन्यांतून प्रवास करून येतं. हे वास्तव जाणून घेतलं तर पाणी किती ''महाग'' आहे हे आपल्या लक्ष्यात येईल. तलावांची क्षेत्रे संरक्षित क्षेत्रे आहेत म्हणजे तो खर्च, जलशुद्धीकरणाच्या यंत्रणांचे खर्च आणि हा प्रचंड व्याप सांभाळणाऱ्या संबंधित पालिका, महापालिका क्षेत्रांतील कर्मचाऱ्यांचा खर्च -- हे सर्व कल्पनेपलीकडे आहे. शिवाय जलवाहिन्यांच्या 'संकुल' असा गुंता पसरायला लागणाऱ्या जागेची किंमत हा मुद्दाही आहेच!

नळ सोडला की पाणी आलं पाहिजे ही अपेक्षा बाळगणं सोपं, पण या विहिरीच, म्हणजे हे तलाव कोरडे राहिले तर आडात, म्हणजे इमारतींच्या टाक्यांमध्ये पाणी येणार कसे?

कोणते आहेत हे तलाव? तर ते असे -

### मुंबईबाहेरील तलाव :

१) तानसा तलाव :

स्थान - ठाणे जिल्ह्यातील खर्डी हे गाव

क्षमता - १२८.६३ मीटर्स

हा तलाव १८९२ ते १९२५ या काळात बांधला गेला.

२) भातसा :

स्थान - ठाणे जिल्ह्यातील खर्डी हे गाव

क्षमता - १४२.०७ लिटर्स

१९७४ साली बांधून पूर्ण झाला.

(पान ४० वर)

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, ठाणे (प्रा.वि.)

**सेवानिवृत्ती :**

सौ. कल्याणी रघुनाथ वाघरे ह्या विद्या प्रसारक मंडळाच्या डॉ. बेडेकर विद्या मंदिर, प्राथमिक विभागात मुख्याध्यापिका ह्या पदावर दि. १/५/२००५ पासून कार्यरत होत्या. त्या गुरुवार दि. ३१/७/२००८ रोजी सेवानिवृत्त झाल्या.



सौ. कल्याणी रघुनाथ वाघरे ३१/७/०८ रोजी सेवानिवृत्तीचा सत्कार. वि. प्र. मंडळाचे सदस्य मा. श्री. श्री. वि. करंदीकर यांच्या हस्ते स्वीकारताना

सौ. वाघरे बाई ह्या शाळेत दि. १७/७/७५ रोजी शिक्षिका म्हणून रुजू झाल्या. अनेक वर्षे शिष्यवृत्ती वर्गाच्या विद्यार्थ्यांना यशस्वीपणे मार्गदर्शन केले.

मुख्याध्यापिका या पदावर सुद्धा त्यांनी आपले काम उत्कृष्टपणे पार पाडले. त्यांना ठाणे महानगर पालिकेतर्फे 'आदर्श शिक्षिका' ह्या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

**पदोन्नती :**

सौ. विजया तानाजी भंडारे ह्यांची प्राथमिक



१ ऑगस्ट २००८ रोजी सौ. विजया तानाजी भंडारे यांनी डॉ. बेडेकर विद्या मंदिर प्राथमिक विभाग, मुख्याध्यापिका पदाची सूत्रे स्वीकारली.

विभागात मुख्याध्यापिका ह्या पदावर शुक्रवार दि. १ ऑगस्ट २००८ रोजी नेमणूक करण्यात आली आहे.

त्यांची शिक्षिका या पदावर दि. ८/६/८१ रोजी नियुक्ती झाली होती. शिक्षिका म्हणून त्यांनी २७ वर्षे विद्यादानाचे पवित्र कार्य केले.

त्यांनी अनेक वर्षे शिष्यवृत्ती वर्गाच्या विद्यार्थ्यांना उत्तम रीतीने मार्गदर्शन केले.

वक्तशीरपणा, शिस्तप्रिय, प्रभावी अध्यापन करण्याची हातोटी हे त्यांचे विशेष गुण. त्या, विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी भाग घ्यावा यासाठी प्रोत्साहन देतात. नाट्य स्पर्धेमधील विद्यार्थ्यांना अभिनय, संवाद शैली शिकवावी ती भंडारे बाईंनीच! त्यांना ज्येष्ठ संगीतकार मा. श्री. श्रीनिवास खळे ह्यांच्या शुभहस्ते 'आदर्श शिक्षिका' हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. निबंध स्पर्धांमध्ये त्या स्वतः भाग घेत. त्यांना वाचनाचा छंद आहे.

ह्या महिन्यात पुढील सण शाळेत साजरे केले :

✚ दीप पूजन (१ ऑगस्ट) :

दिवा स्वत: जळतो व दुसऱ्याला प्रकाश देतो. विद्यार्थ्यात सहकार्य, त्यागाची भावना वाढीस लागावी, म्हणून शाळेत 'दीप पूजन' केले. विविध प्रकारचे दिवे लावून त्यांची पूजा केली. कहाणी सांगून प्रसाद वाटला.

✚ रक्षाबंधन (१४ ऑगस्ट) :

भाऊ बहिणींच्या अतूट नात्याचा, प्रेमाचा असा हा सण शाळेत मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांकरिता शाळेने राख्या आणल्या होत्या. कुंकुमतिलक लावून विद्यार्थ्यांना राख्या बांधल्या. गोळ्या वाटल्या. यातून 'मुले-मुली समानता' हा संदेश विद्यार्थ्यांना मिळाला.

✚ श्रावणी शुक्रवार (२२ ऑगस्ट) :

भारतीय संस्कृतीत 'श्रावण' महिन्याला, 'महिन्यांचा राजा' असे म्हणतात. या महिन्यातील प्रत्येक वाराला विशिष्ट महत्त्व आहे. लहान मुलांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, सुख, आनंद मिळावा याकरिता श्रावणी शुक्रवारी जिवतीची पूजा करतात. याच उद्देशाने शाळेत 'श्रावणी शुक्रवार' साजरा केला. विद्यार्थ्यांना चणे व बुंदीचे लाडू वाटले. श्रावणी शुक्रवारची कहाणी सांगितली.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.)

✚ 'राष्ट्रीय बालविज्ञान परिषद २००८' या अनुषंगाने 'जिज्ञासा ट्रस्ट, ठाणे' यांचे तर्फे शिक्षक व विद्यार्थी यांच्यासाठी आयोजित कार्यशाळेस इ. ७ वी व ८ वी तील निवडक विद्यार्थी व सौ. उज्वला धोत्रे उपस्थित होत्या.

✚ दि. ४ जुलै रोजी इ. ५ वी च्या वर्गांच्या पालक सभेस वर्षभर होणाऱ्या लेखी व तोंडी परीक्षा तसेच गुणविभागणी, शाळेचे नियम, स्पर्धा परीक्षा, शिस्त व मुलांचा अभ्यास इ. संदर्भातील माहिती पालकांना दिली. मुख्याध्यापिका व उपमुख्याध्यापिका यांनी सर्व वर्गांना भेट देऊन शाळेच्या नियमावलीची माहिती दिली.

✚ इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी IPH या संस्थेमार्फत दि. २८ जुले रोजी 'मनोविकास' कार्यक्रम आयोजित केला. मनोविकासाच्या सौ. वर्षा हगे, श्री. चोन्हाडे यांनी नाट्यछटांमधून सकारात्मक व नकारात्मक दृष्टीकोनाचे वर्तणुकीवर होणारे परिणाम दाखवले. तसेच मन हे हृदयात नसून मेंदूच्या पेशीत आहे. काय हवंय हे जाणून, निश्चित करून त्याप्रमाणे वागणूक ठेवावी हे पटवून दिले.

✚ 'शिक्षण स्फूर्ती-पुणे' या संस्थेने दि. ५ जुले रोजी 'Total Quality Management of the schools and Latest Trends in Education' या विषयावर संस्थेचे अध्यक्ष श्री. जयप्रकाश सोमानी यांनी व्याख्यान दिले. व्याख्यानास श्री. शशांक भोईर उपस्थित होते.

✚ 'ज्ञान विज्ञान प्रतिभा परीक्षा - पुणे' २००७-०८ या वर्षी झालेल्या परीक्षेत ३७ विद्यार्थ्यांपैकी १४ विद्यार्थी यशस्वी झाले. यशस्वी विद्यार्थी पुढील प्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| प्रणिता काळभोर | हेमेश सावकार | अनिकेत पाटील |
| ऐश्वर्या राणे | आकांक्षा माने | विक्रांत देवरे |
| तनिषा देसाई | सिद्धी मोरे | श्रीहरि मुळगुंद |
| ऐश्वर्या पेडणेकर | ओमकार सावंत | सायली येनभर |
| वैशाली बच्छाव | कुणाल क्षीरसागर | |

✚ इ. ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांना 'जिंकी रे जिंकी' चित्रपट दाखविण्यात आला.

✚ १२ जुलै रोजी शिक्षक - पालक संघाची स्थापना झाली. या सभेस सर्व शिक्षक तसेच सर्व वर्गांचे पालक प्रतिनिधी उपस्थित होते. उपस्थित पालक प्रतिनिधींपैकी

खालील पालकांची प्रतिनिधी म्हणून निवड झाली.

श्री. सुभाष दिगंबर ठोंबरे श्री. रमेश विष्णु नेने

सौ. प्रतिभा सुधीर नातू सौ. छाया पाचारणे

या संघ स्थापनेस ज्ञानसाधना कॉलेजचे प्राध्यापक श्री. दत्तात्रय चितळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

+ १८ जुले रोजी झालेल्या गुरुपौर्णिमा कार्यक्रमात - इ. ५ वी साठी श्री. धोंडे, इ. ६ वी साठी श्रीमती आशा जोशी, इ. ७ वी साठी श्री. धोंडे, सौ. चौवळ, इ. ९ वी साठी श्री. सुहास जावडेकर, इ. १० वी साठी सिंधुताई सपकाळ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. इ. ८ वी साठी आगळा वेगळा असा कीर्तनाचा कार्यक्रम श्री. राजेंद्र पाटणकर आणि श्री. मकरंद जोशी यांनी सादर केला.

+ इ. १० वी च्या विद्यार्थ्यांच्या गुरुपौर्णिमा कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ उपस्थित होत्या. त्यांनी गुरुबरोबर आईलाही मान द्यावा कारण तीच दुःख पचवते, झेलते आणि तुम्हाला वाढवते असे सांगितले. इ. १० वी च्या विद्यार्थ्यांनी सिंधुताईंच्या कार्यासाठी निधी गोळा केला. डॉ. दप्तरदार यांनी रु. ५००१/- ची देणगी जाहीर केली. मान. मुख्याध्यापिका सौ. कळमकर यांनी त्यांच्या कार्यात सामील होण्याचे आश्वासन दिले.

+ ११ जुलै रोजी मो.ह. विद्यालय येथे 'सन्मित्र' दैनिकाचे संस्थापक कै. स. पां. जोशींनी मराठी मायबोली अभिनव संस्कार, शब्दभ्रम, शब्दखेळ, शब्दसंग्रह असे कार्यक्रम केले. सदर कार्यक्रमास सौ. शिंगाडे उपस्थित होत्या.

+ १२ जुलै रोजी पवार पब्लिक स्कूल यांच्या विद्यमाने 'आजची मुले : शिक्षण' मुलांच्या वैयक्तिक, सामाजिक, समस्या विषयाची कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यक्रमासाठी सौ. बोन्हाडे व सौ. धनगर उपस्थित होत्या.

+ 'प्रॉक्टर ॲन्ड गॅम्बल' कंपनीतर्फे इ. ७ वी व ८ वी च्या विद्यार्थीनींना त्यांच्या 'वयात येताना' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

+ गुरुपौर्णिमेनिमित्त स्टुडंटस् फ्युचर असोसिएशन तर्फे मान. मुख्याध्यापिका सौ. कळमकर यांना 'भगवद्गीता' देण्यात आली. तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख श्री. राजेश मोरे यांच्यातर्फे फुलांचा गुच्छही मान. मुख्याध्यापिका यांना देण्यात आला.

+ लो. टिळक पुण्यतिथीनिमित्त दि. २८ जुलै रोजी झालेल्या हस्ताक्षर स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| इ. ५ वी | - | उत्तीर भरत अहिरे | (५ ब) |
| इ. ६ वी | - | अक्षया ज. पाटील | (६ ब) |
| इ. ७ वी | - | हर्षदा बा. नेवाळकर | (७ ब) |
| इ. ८ वी | - | प्रियांका सं. पेडणेकर | (८ अ) |
| इ. ९ वी | - | मनाली प्र. निमसे | (९ अ) |
| इ. १० वी | - | श्रद्धा र. पाटील | (१० ड) |

तसेच ३० जुलै रोजी वक्तृत्व स्पर्धाही घेण्यात आली. त्याचा निकाल पुढील प्रमाणे -

| | | | | |
|---|---|---|---|---|
| इ.५वी | | - | मालविका विनोद रासम | प्रथम |
| इ.६वी | (अ) | - | प्रणिता हनुमंत काळभोर | प्रथम |
| | (ड) | - | स्नेहल सखाराम पाटील | द्वितीय |
| | (क) | - | अक्षय युवराज मोहिते | उत्तेजनार्थ |
| इ.७वी | (अ) | - | मृदुला गणेश शेटे | प्रथम |
| | (ब) | - | श्रीहरि पुरुषोत्तम मुळगुंद | द्वितीय |
| | (ड) | - | आकांक्षा बबन माने | उत्तेजनार्थ |
| इ.८वी | (अ) | - | तनिषा पांडुरंग देसाई | |
| इ.९वी | (अ) | - | प्रियांका एकनाथ गुरव | |
| इ.१०वी | (अ) | - | देविका संजय तावगावकर | |

*रिकामा कलश भरला जात असताना आवाज करतो. - वि. स. खांडेकर*

+ मार्च २००८ च्या शालांत परीक्षेत इ. १० वी ड मधील कानगुडे विद्या मदन या विद्यार्थीनीला शालांत परीक्षेच्या गुणात पुन्हा पडताळणी करताना गणित विषयात ३५ ऐवजी ५२ गुण जाहीर झाल्याने ती उत्तीर्ण झाली. त्यामुळे आता शाळेचा निकाल ९७% झाला.

+ श्वेता अशोक जाधव हिला शालांत परीक्षेत इंग्रजी विषयात १०० पैकी ९४ गुण मिळाले. विशेष म्हणजे ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतून श्वेताला सर्वाधिक गुण मिळाले. त्याबद्दल ठाणे महानगरपालिकेने रोख रु. २००/- आणि गौरवचिन्ह देऊन तिचा सत्कार केला.

+ 'फोर कोडस् इंडिया' ही संस्था आदिवासी विभागातील लोगांची नेत्रचिकित्सा, अनाथ व निराधारांना मदत, मंदबुद्धी मुलांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना मदत करते. यंदा या संस्थेच्या मदतीसाठी इ. ६ वी च्या विद्यार्थ्यांनी रु. १३८०/- निधी संकलित केला.

+ 'बालमित्र' प्रबोधिनीसाठी १२४ विद्यार्थी सभासद झाले.

+ 'मॅकमिलन' या शैक्षणिक संस्थेतर्फे 'मराठी शालेय ॲटलास' प्रकाशित होत आहे. त्यासाठी इ. ५ वी ते १० वी च्या भूगोल शिक्षकांनी एक प्रश्नावली सोडवली.

+ इ. ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'संस्कृत भाषा परिचय' म्हणून सुरवाणी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. नांदेडकर यांनी वर्ग घेतला.

+ 'ऑल इंडिया कॅमल कलर स्पर्धा' २ ऑगस्ट रोजी इ. ५ वी ते इ. १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली. त्यासाठी विषय होते -

इ. ५ वी ते ७ वी - आपली संस्कृती

इ. ८ वी ते १० वी - २०२० सालातील भारत

+ १ ऑगस्ट रोजी सरस्वती सेकंडरी स्कूल, नौपाडा येथे बालविज्ञान चळवळीच्या २००८-०९ शैक्षणिक वर्षाच्या उद्घाटन समारंभात प्रमुख वक्ते ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. शंकरराव गोवारीकर यांनी विद्यार्थ्यांना अणुउर्जेसंबंधी माहिती दिली. तसेच त्यांच्या शंकांचे निरसन केले. या कार्यक्रमात इ. ९ वी तील २० विज्ञानप्रेमी विद्यार्थी व विज्ञान शिक्षिका सौ. वंदना अडसुळे उपस्थित होत्या.

+ लो. टिळक पुण्यतिथीनिमित्त प्रमुख पाहुण्या मान. सौ. नंदिनी अविनाश बर्वे यांना आमंत्रित करण्यात आले. या कार्यक्रमास मान. मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका तसेच इ. ९ वी चे शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. इ. १० वी तील कौस्तुभ बांबरकर, वेदाक्ष जोशी, प्रसाद तिरोडकर या विद्यार्थ्यांनी टिळकांच्या स्वदेशी चळवळीवर जोशपूर्ण पोवाडा सादर केला. लो. टिळकांचे बालपण, टिळकांचे मंडालेतील दिवस, टिळकांची पत्रकारिता या विषयांवर विद्यार्थ्यांची भाषणे झाली तसेच प्रमुख पाहुण्यांनी अतिशय उत्कंठावर्धक भाषण केले.

## सौ.आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा (प्राथमिक विभाग)

दरवर्षी प्रमाणे ५ ऑगस्ट रोजी कै. श्री. गुणाकर जोशी ह्यांचा स्मृतिदिनी त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. तसेच २००७ - २००८ वर्षातील लक्षणीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या स्मरणार्थ पारितोषिके देण्यात आली.

## सौ.आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा (माध्यमिक विभाग)

प्रतिवर्षीप्रमाणे ५ ऑगस्ट रोजी सौ. ए. के. जोशी शाळेत गुणाकर जोशी स्मृतिदिनी सौ. तेलंग मॅडम यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना कै. गुणाकर जोशी यांच्या कार्याचा परिचय करून दिला. त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर २००७

- २००८ वर्षातील लक्षणीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना कै. गुणाकर जोशी यांच्या स्मरणार्थ पारितोषिके दिली गेली. अशा तऱ्हेने कै. गुणाकर जोशी यांच्या स्मरणार्थ अभिवादन करून कार्यक्रमाची सांगता झाली.

### जोशी - बेडेकर महाविद्यालय

३० जून ते ९ ऑगस्ट या कालावधीत संपन्न झालेले कार्यक्रम -

+ दि. ३० जून रोजी 'स्टाफ अॅकॅडमी' चे उद्घाटन प्राचार्या डॉ. सौ. सिंह यांच्या हस्ते झाले. त्यावेळी कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या प्रा. बहेल यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी अनेक प्राध्यापकांनी प्रा. बहेल यांच्याविषयी आपल्या मनातील भावना बोलून दाखवल्या.

+ दि. ४ जुलै रोजी 'व्याससभा' अंतर्गत 'नोकरी आणि कौटुंबिक जीवन संतुलन' याविषयी चर्चा करण्यात आली.

+ दि. ४ जुलै रोजी परदेशी भाषांविषयी 'Orientation' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

+ दि. १२ जुलै रोजी 'टॅलेंट अॅकॅडमी'चा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विख्यात नृत्यांगना सौ. मेघा दिवेकर लाभल्या होत्या. त्यांनी 'नृत्य' (शास्त्रीय तसेच लोकनृत्य) या विषयावर प्रात्यक्षिकासह कार्यशाळा घेतली. हा कार्यक्रम 'कात्यायन' सभागृहात झाला.

+ दि. १९ जुलै रोजी दिशा व्यासपीठातर्फे 'काव्यसुर' या मराठी कविता व भावगीताच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

+ दि. २५ जुलै रोजी 'व्याससभा' अंतर्गत 'Psychology of Money' या विषयावर प्राध्यापकांनी चर्चा केली.

+ दि. २६ जुलै रोजी जोशी - बेडेकर फिल्म सोसायटी तर्फे 'The Cup' हा चित्रपट दाखवण्यात आला.

+ दि. ३० जुलै रोजी 'व्याससभा' अंतर्गत 'Psychology of Money' या विषयावर कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी चर्चा केली.

+ दि. ३० जुलै रोजी 'इंग्रजी वाङ्मय मंडळाचा' उद्घाटन सोहळा संपन्न झाला. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बडोदे, इंग्रजी विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, लाभले होते. त्यांनी 'Indian Women Novelists' विषयावर व्याख्यान दिले. या प्रसंगी इंग्रजी विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तिपत्रिकांचे उद्घाटन झाले.

+ दि. ३१ जुलै रोजी कनिष्ठ महाविद्यालयांच्या 'Arts Circle Literary Association' चे उद्घाटन झाले.

+ दि. ३१ जुलै रोजी 'व्याससभा' अंतर्गत अर्थशास्त्राचे प्राध्यापक श्री. भिडे यांनी वि. दा. करंदीकर यांच्या 'स्वेदगंगा' व लक्ष्मीकांत तांबोळी यांच्या 'रानसावल्या' या पुस्तकांचे परीक्षण केले.

+ दि. १ ऑगस्ट रोजी महाविद्यलयाच्या तंत्रनिकेतन विभागाला २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल मंडळाच्या नियमानुसार तंत्रनिकेतनला ध्वज प्रदान करण्यात आला. सालाबादप्रमाणे १ ऑगस्ट हा विद्या प्रसारक मंडळाचा वर्धापन दिन म्हणून वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी संस्थेच्या सर्व विभाग प्रमुखांनी वर्षाचा अहवाल सादर केला व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

+ दि. ४ ऑगस्ट रोजी मराठी वाङ्मय मंडळातर्फे 'संवाद - एक अनुभव' हा कार्यक्रम प्रा. सुचित्रा नाईक व प्रा. प्रियंवदा टेकेकर यांनी सादर केला.

+ दि. ७ ऑगस्ट रोजी 'Sports Academy' चे उद्घाटन प्राचार्या डॉ. सौ. सिंह यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी श्री. प्रदीप शेट्टी यांनी कराटे प्रात्यक्षिक दाखविले.

---

*या जगात सुख आणि दुःख याच दोन गोष्टी खऱ्या आहेत. बाकी आहे ती माया.*

+ दि. ८ ऑगस्ट रोजी 'व्यासपीठ' अंतर्गत 'Terrorism' या विषयावर प्राध्यापकांनी चर्चा केली.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे महापालिका विधी महाविद्यालय, ठाणे

**ठाणे विधी महाविद्यालयाच्या कायदा सहाय्यता कक्षाची ठाणे व कल्याण कारागृहास भेट :**

मुंबई उच्च न्यायालयाच्या प्रकाश विठ्ठल खरात वि. महाराष्ट्र राज्य सरकार या खटल्यात एप्रिल २००८ मध्ये दिलेल्या निर्देशांनुसार ठाणे जिल्हा व सत्र न्यायाधीश प्रमुख व ठाणे विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार यांची चर्चा होऊन या संदर्भातील महाविद्यालयाचे योगदान काय असावे याबाबत निर्णय घेण्यात आला होता त्याला अनुसरून वि. प्र. मंडळाच्या ठाणे विधी महाविद्यालयातील कायदा सहायता कक्षाच्या वतीने ९, १० जुलै रोजी अनुक्रमे ठाणे व कल्याण मध्यवर्ती कारागृहाला भेट देण्यात आली.

न्यायालयाच्या आदेशानुसार कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगीत असलेले किती कैदी आणि त्यातील किती कैद्यांची महाराष्ट्र सरकारने वारित केलेल्या निर्देशांनुसार जन्मठेप पूर्ण होण्याआधीच सुटका होऊ शकते व अशा किती कैद्यांना कायदा सहाय्यतेची गरज आहे. याचा आढावा घेण्यात आला. त्याचा रितसर अहवाल न्यायालयाला पाठविण्यात आला. महाविद्यालयाने घेतलेल्या परिश्रमाचे ठाणे जिल्हा व सत्र न्यायाधीश प्रमुख श्री. वांचळ्ा यांनी कौतुक केले.

यामध्ये महाविद्यालयातील व्याख्याता व कायदा सहाय्यता कक्ष प्रमुख सौ. रश्मी आचार्य, व्याख्याता सौ. संविता डवराल तसेच श्री. विवेक जोशी विद्यार्थी समन्वयक श्री. प्रविण दोंड, श्री. विनायक म्हात्रे, श्री. विनायक भोईर व श्री. नरेश पाटील हे विद्यार्थी सहभागी झाले होते.

यासाठी ठाणे जिल्हा व सत्र न्यायाधीश प्रमुख श्री. वांचळा, न्यायाधीश श्री. भोसले ठाणे, जिल्हा कायदा सेवा समिती तसेच कारागृह अधिक्षक व त्यांचे सहकारी, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. श्री विद्या जयकुमार यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

विधी महाविद्यालय अहवाल लेखन
**सौ. प्रज्ञा राजेबहादूर**

## वि. प्र. मं. चे तंत्र निकेतन

**महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ उन्हाळी २००८ परिक्षेचे निकाल जाहीर :**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ उन्हाळी परिक्षेचे निकाल जाहीर झाले असून विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्र निकेतन मधील विद्यार्थ्यांनी चांगले यश संपादन केले आहे. तंत्र निकेतनात अव्वल आलेल्या विद्यार्थ्यांची नावे व गुण खालील प्रमाणे

**प्रथम वर्ष**

| क्र. | अभ्यासक्रम | विद्यार्थ्यांचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | CH | कोयंडे, हर्षद दिलिप | ६६.६६% |
| २ | EP | मदन, गौरी राजेंद्र | ७९.५५% |
| ३ | IE | प्रभु, अक्षता नरसिन्ह | ८९.२४% |
| ४ | IS | पाटील, अवधूत आनंदा | ७४.९६% |
| ५ | IF | अग्रेसर, स्नेहल नितीन | ८७.३६% |
| ६ | CO | राणे, तेजस प्रमोद | ८४.६९% |
| ७ | MU | चव्हाण, नीलम दत्ताराम | ८४.२७% |

**द्वितीय वर्ष**

| क्र. | अभ्यासक्रम | विद्यार्थ्यांचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | CH | वाघमारे, अभिजीत अरूण | ८७.०८% |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | EP | महाशब्दे, गौरव श्रीनिवास | ७६.८७% |
| ३ | IE | मोहिते, प्रविण धनाजी | ८०.८४% |
| ४ | IS | हजबंड, जयश्री सुरेश | ७२.०६% |
| ५ | IF | अवनवे, महेश अशोक | ८६.६८% |
| ६ | CO | सांगलीकर, अनिषा दिलिप | ८६.०३% |
| ७ | MU | खोत, सुजाता विलास | ७५.७०% |

**तृतीय वर्ष**

| क्र. | अभ्यासक्रम | विद्यार्थ्यांचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | CH | शृंरंगधर, ग्रिष्मा दिपक | ८३.०४% |
| २ | EP | शेख, असीम असिफ | ८२.६१% |
| ३ | IE | सावंत, अजिक्य किशोर | ८६.००% |
| ४ | IS | कळेकर, राहूल श्रीकांत | ७७.२३% |
| ५ | IF | सिंग, शशांक राजेंद्र तारा | ८९.५८% |
| ६ | CO | गाढवे, प्रतिमा लक्ष्मण | ८४.६४% |
| ७ | MU | भुस्कुटे, रश्मी अशोक | ८९.८८% |

वरील यशस्वी विद्यार्थ्यांचे वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून अभिनंदन करण्यात आले.

**+ ISTE CHAPTER २००८ तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन :**

वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन मध्ये ISTE CHAPTER- २००८ तर्फे रक्तदान शिबिर शनिवार दिनांक २, ऑगस्ट रोजी १०.०० ते ३.०० या वेळात घेण्यात आले. तंत्रनिकेतनमधील अनेक इच्छुक विद्यार्थी - विद्यार्थीनींनी तसेच कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले.

प्रा. सौ. जी. एस. इंगवले यांनी सेक्रेटरी म्हणून काम पाहिले.



ध्वज प्रदान कार्यक्रमानिमित्त विद्या प्रसारक मंडळाचे सभासद श्रीयुत श्री. वि. करंदीकर यांचे शुभहस्ते तंत्रनिकेतनच्या इ.पी.एस. विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. सौ. एन. व्ही. वडेर याचेकडे गुलाबी रंगाचा ध्वज प्रदान करीत असताना. सोबत मंडळाचे पदाधिकारी, तंत्रनिकेतनमधील सर्व विभागप्रमुख, मंडळाचे कर्मचारी इत्यादी.

**+ रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त तंत्रनिकेतनला विद्या प्रसारक मंडळाकडून ध्वज प्रदान :**

१ ऑगस्ट (सन १९३५) विद्या प्रसारक मंडळाचा स्थापना दिन. या दिनाचे औचित्यसाधून तंत्रनिकेतनला २५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त मंडळाकडून गुलाबी रंगाचा ध्वज प्रदान करण्यात आला. ध्वज प्रदान कार्यक्रम शुक्रवार दि. १ ऑगस्ट रोजी सकाळी ९.०० वाजता महाविद्यालय परिसरात पार पडला. विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ सभासद श्री. श्री. वि. करंदीकर यांचे हस्ते तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक यांचे अनुपस्थित इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टिम विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. सौ. एन. व्ही. वडेर यांच्याकडे ध्वज प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकारी श्री. उत्तम जोशी, डॉ. अशोक वापट, सौ. ए. ए. बापट, श्री. दिलीप जोशी, श्री. गोविंद पानसरे, प्रीती पानसरे, तसेच तंत्रनिकेतनचे माजी

प्राचार्य एस. एस. मुजुमदार, परिसरामधील सर्व प्राचार्य, प्राध्यापक, तंत्रनिकेतन मधील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाअगोदर मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

तंत्रनिकेतन अहवाल लेखन
श्री. चंद्रकांत शिंगाडे



श्री. मो. दि. पराडकर

## विद्या प्रसारक मंडळ

डॉ. वा. ना बेडेकर यांनी १९५७-५८ मध्ये विद्या प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी घेतली त्या घटनेस या वर्षी ५० वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने शुक्रवारी दि. २२ ऑगस्ट रोजी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



श्री. जयंत नारायण कयाल

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नरेंद्र बेडेकर यांनी केली. ५० वर्षांपूर्वी (कै.) वा. ना. बेडेकर यांच्यासह विद्या प्रसारक मंडळात आलेले ज्येष्ठ सदस्य श्री. मा. ना. पाटील व डॉ. मो. दि. पराडकर यांचा संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सौ. सुमेधा बेडेकर यांनी सादर केलेल्या गणेश स्तवनाने झाली.



श्री. मा. ना. पाटील

महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झालेल्या या विशेष कार्यक्रमात, मंडळाचे सभासद श्री. जयंत नारायण कयाल यांना अलीकडेच अणुउर्जा विभागातर्फे अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पुरस्कार योजने अंतर्गत विशेष सहभागाबद्दल पारितोषिक मिळाले. भारताचे माजी राष्ट्रपती श्री. ए.पी.जे कलाम यांच्या हस्ते प्रदान करण्यात आलेल्या या पारितोषिकाबद्दल मंडळातर्फे त्यांचा गौरव करण्यात आला. अणुभट्टींच्या विकास कार्यातील श्री. कयाल यांचे योगदान महत्त्वाचे आहे.



संगीताची मैफल

या गौरव सोहळ्यानंतर संगीताचा एक छोटा कार्यक्रमही सादर करण्यात आला.

विद्याप्रसारक मंडळाच्या 'दिशा व्यासपीठ' या उपक्रमांतील तिसरा कार्यक्रम महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात दि. ३० ऑगस्ट रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी या उपक्रमामागील संकल्पना स्पष्ट केली.

शिल्पाकृती कशी पहावी, तिची वैशिष्ट्ये कशी समजावून घ्यावीत या संदर्भात ख्यातकीर्त मूर्ती शिल्पकार श्री. सदाशिवराव साठे व वास्तुविशारद श्री. वसंतराव पानसरे यांची डॉ. विजय बेडेकरांनी उद्बोधक मुलाखत यावेळी घेतली. श्री. साठे यांनी प्रतिमाशिल्प निर्मितीतील आपले अनेक अनुभव यावेळी तपशीलांसह सांगितले. तसेच श्री. पानसरे यांनी एखाद्या प्रतिमा शिल्पाची जागा निवडण्यामागील विचार किती महत्त्वाचे असतात, यासंबंधी आपले विचार मांडले. लंडनमधील वास्तुशिल्पांच्या चित्रपारदर्शिका दाखवून डॉ. बेडेकर यांनी त्यांची माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. अनिल भावड यांनी केले. •••

(पान ३१ वरून)

३) मोडक सागर :

स्थान - ठाणे जिल्ह्यातील खर्डी हे गाव

क्षमता - १६३.१५ लिटर्स

महापालिकेचे तात्कालीन अभियंते नानासाहेब मोडक यांच्या नेतृत्वाखालील गटाने १९५७ साली या तलावाचे बांधकाम पूर्ण केले. त्यामुळे याचे नाव 'मोडक सागर' असे ठेवले गेले.

४) अपर वैतरणा :

स्थान - नाशिक जिल्ह्यातील इगतपुरीजवळ

क्षमता - ६०३.५१ लिटर्स

१९७२ साली हा बांधून पूर्ण झाला.

***मुंबईतील तलाव :***

५) विहार :

स्थान - पवई

क्षमता - ८०.४२ मीटर्स

१८६० साली बांधून पूर्ण

६) तुळशी :

स्थान - संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

क्षमता - १३९.१७ मीटर्स

१८७९ साली बांधून पूर्ण

या माहिती मागील उद्देश पाणी किती महत्त्वाचे आहे हे जाणवून देणे हा आहे. म्हणजेच पाणी वापरण्यापूर्वी थेंब थेंब विचार करायला हवा.

श्री. विवेक सरोदे

कल्याण

•••

*तोंडावर स्तुती करतो, तो आपला शत्रू असतो.*